




संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा








रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. २६.०२.२०२६ | अंक नं. २७३ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020












नवीपेठ येथे
रोडटच दुकान देणे आहे

अहिल्यानगर शहरात मुख्य बाजार पेठेत नवीपेठ येथे सुमारे ११०० चौ. फुट रोडटच दुकान विकणे अथवा भाडे कराराने देणे आहे.

गोल्ड, इलेक्ट्रॉनिक्स, साडी व कापड व्यवसायीक या सारख्या व इतर सर्व व्यवसायासाठी उपयुक्त.

-: संपर्क :-
8208878322 / 9850113713

GALAXY




स्वीकृत नगरसेवकपदी राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार) पक्षाच्या वतीने विकी जगताप, रेवणनाथ पवार व बाबासाहेब नागरगोजे यांची तर भारतीय जनता पक्षाच्या वतीने रवींद्र बारस्कर व विशाल नाकाडे यांची निवड करण्यात आली.

## राष्ट्रवादी तीन तर भाजपाच्या दोन 'स्विकृत सदस्यां'ची निवड जाहीर

### अर्धवट कागदपत्रांमुळे शिवसेना शिंदे गटाच्या सदस्याचा अर्ज फेटाळला

नगर - अहिल्यानगर महापालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या (अजितपवार गट) ३ तर भाजपाच्या २ स्विकृत सदस्यांची निवड जाहीर करण्यात आली आहे. शिवसेना शिंदे गटाच्या कोट्यातून नाव देण्यात आलेल्या सदस्याची कागदपत्रे अर्धवट असल्याने तसेच (पुढील मजकूर पान २ वर)




जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# झेंडीगेट परिसरात टपरीला भीषण आग; साहित्य भस्मसात; हजारोंचे नुकसान

नगर -शहरातील झेंडीगेट पोलीस चौकीजवळ असलेल्या एका पादत्राणांच्या टपरीला २४ फेब्रुवारी रोजी सकाळी भीषण आग लागली. या आगीत टपरीमधील शिलाई मशीन, कच्चा माल आणि यंत्रसामग्री जळून खाक झाली असून, सुमारे ५० हजार रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे. सुदैवाने, या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

याबाबत मिळालेली अधिक माहिती अशी की, बुऱ्हाणनगर येथील रहिवासी परसराम बालाराम नरवरीया यांची झेंडीगेट परिसरात 'चौधरी फूटवेअर' नावाची टपरी आहे. गेल्या वर्षभरापासून अपघातामुळे त्यांनी दुकान बंद ठेवले होते. मंगळवारी सकाळी नऊ वाजेच्या सुमारास अचानक या टपरीतून धुराचे लोट बाहेर पडू लागले. ही बाब नातेवाईक विष्णू बुंदेले यांच्या लक्षात येताच त्यांनी तातडीने नरवरीया यांना याची कल्पना दिली.

घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. जवानांनी शर्थीचे प्रयत्न करून आग विझवली, मात्र तोपर्यंत आतील शिलाई मशीन, ग्राइंडिंग मशीन, तीन लाकडी पेट्या आणि चपला बनवण्यासाठी लागणारा चामडी कच्चा माल पूर्णपणे जळून कोळसा झाला होता. ही आग शॉर्टसर्किटमुळे लागली की अन्य कारणाने, याचा तपास पोलीस करत आहेत. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात जळीत खबर नोंदवण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

# पंचपीर चावडी परिसरात फळविक्रेत्यावर हल्ला

नगर - शहरातील पंचपीर चावडी परिसरात फळांचा माल पाहण्यासाठी गेलेल्या एका व्यापाऱ्याला जुन्या आर्थिक वादातून आणि व्यापार न केल्याच्या रागातून दोघांनी बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. या हल्ल्यात फिर्यादी अलीम सलीम बागवान (वय ३२, रा. झेंडाचौक) हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, अलीम बागवान हे फळ विक्रीचा व्यवसाय करतात. २४ फेब्रुवारी रोजी रात्री ८ वाजेच्या सुमारास ते अप्सरा टॉकीज जवळील आक्रम बागवान यांच्याकडे खरबुजाचा माल पाहण्यासाठी गेले होते. त्यावेळी आरोपी आसिफ अल्ताफ बागवान आणि अल्ताफ कासम बागवान (दोघे रा. टिळक रोड) तेथे आले. आसिफ याने अलीमला त्याच्या गाडीवर बसून गोडाऊनला चलण्यास सांगितले. अलीमने नकार दिला असता, आरोपींनी शिवीगाळ करण्यास सुरुवात केली.

'तुझ्या वडिलांकडे आमचे ४० लाख रुपये बाकी आहेत, ते द्यायला सांग' असे म्हणत अल्ताफने वाद उकरून काढला. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले आणि दोन्ही आरोपींनी अलीमला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. यावेळी अल्ताफने एका लोखंडी वस्तूने अलीमच्या डाव्या कानाच्या मागे जोरात प्रहार केला. या हल्ल्यात अलीमच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन रक्तस्राव सुरू झाला. फिर्यादीचा भाऊ रफीक आणि स्थानिक नागरिकांनी मध्यस्थी करत त्यांची सुटका केली. जखमी अलीमवर सध्या उपचार सुरू असून, या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस हवालदार संदीप पितळे या प्रकरणाचा तपास करत आहेत.

# छत्रपती संभाजीनगर महामार्गावर रात्रीच्या वेळी दाम्पत्याला अडवून लुटले

## महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र हिसकावून पळविले; गुन्हा दाखल

नगर - छत्रपती संभाजीनगर महामार्गावर नगर तालुक्यातील इमामपूर घाट परिसरात गुन्हेगारांचा वावर वाढला असून, पांढरीपुलाजवळ दुचाकीवरून जाणाऱ्या दांपत्याला अडवून दोन अनोळखी चोरट्यांनी महिलेच्या गळ्यातील सोन्याचे दागिने हिसकावून नेल्याची धक्कादायक घटना २४ फेब्रुवारी रोजी रात्री ९.५० वाजेच्या सुमारास घडली आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नेवासा तालुक्यातील वांजोळी येथील रहिवासी मिलिंद गणपत भवर हे आपल्या पत्नीसह जेऊर येथील नातेवाईकांकडील जेवणाचा कार्यक्रम आटोपून दुचाकीवरून घरी परतत होते. रात्री ९.५० वाजेच्या सुमारास इमामपूर घाटातील निसर्ग हॉटेलसमोर पांढरीपुलाजवळ मागून येणाऱ्या लाल-काळ्या रंगाच्या पल्सर मोटारसायकलवरील दोन अनोळखी इसमांनी भवर यांची गाडी अडवली. चोरट्यांनी जबरदस्तीने महिलेच्या गळ्यातील दोन तोळे वजनाचे सोन्याचे मणी मंगळसूत्र हिसकावून अंधाराचा फायदा घेत पोबारा केला.

या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून महामार्गावरील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. घटनेची माहिती मिळताच एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षकमाणिक चौधरी आणि पोलीस उपनिरीक्षक मनोज मोंढे यांनी घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली. फिर्यादी मिलिंद भवर यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी दोन अज्ञात आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०९ (४) आणि ३ (५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मनोज मोंढे करत आहेत.

# राष्ट्रवादी तीन तर भाजपाच्या दोन 'स्विकृत सदस्यां'ची निवड जाहीर


विकी जगताप


रेवणनाथ पवार


बाबासाहेब नागरगोजे


रवींद्र बारस्कर


विशाल नाकाडे

(पान १ वरुन)

शपथपत्र नसल्याने त्यांचा अर्ज फेटाळण्यात आला असून आता पुढच्या सभेत शिवसेनेच्या कोट्यातील सदस्याची निवड केली जाणार आहे.

स्वीकृत नगरसेवक पदी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या वतीने विकी दादासाहेब जगताप, रेवणनाथ दगडू पवार व बाबासाहेब नागरगोजे यांची निवड करण्यात आली तर भारतीय जनता पक्षाच्या वतीने रवींद्र बारस्कर व विशाल रोहिदास नाकाडे यांची निवड करण्यात आली. शिवसेना शिंदे गटाच्या वतीने आदेश सुरेश जाधव यांचा अर्ज देण्यात आला होता, मात्र अर्जासोबतचे कागदपत्रे अर्धवट असल्याने आणि शपथपत्र नसल्याने तो अर्ज फेटाळण्यात आला आहे. आता पुढच्या सभेत शिवसेनेच्या कोट्यातील सदस्याची निवड केली जाणार आहे.

### स्थायी व 'महिला बालकल्याण'च्या सदस्यांच्या निवडीही जाहीर

दरम्यान सकाळी ११ वाजता झालेल्या पहिल्या सभेत स्थायी समिती आणि महिला बालकल्याण समितीच्या सदस्यांची निवड जाहीर करण्यात आली. यामध्ये भाजप राष्ट्रवादी आणि शिवसेना या सर्वच पक्षांनी नव्या जुनांचा मेळ घातला. स्थायी व महिला बालकल्याण मध्ये काँग्रेस एमआयएमलाही इंट्री करता आली.

महापालिकेच्या राष्ट्रमाता जिजाऊ सभागृहामध्ये सर्वसाधारण सभेला महापौर ज्योती गाडे यांच्या अध्यक्षतेखाली प्रारंभ झाला. सुरुवातीला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे गटनेते प्रकाश भागानगरे, भाजपाच्या गटनेत्या शारदाताई ढवण शिवसेनेचे गटनेते दत्तात्रय कावरे, एमआयएमचे गटनेते शाहबाज सय्यद, काँग्रेसचे गटनेते शम्स खान यांनी बंद पाकिटामध्ये सदस्यांची नावे महापौरांच्या ताब्यात दिली. त्यानंतर महापौर व उपमहापौर यांनी बंद पाकिटे उघडून सदस्यांची नावे जाहीर केली.

त्यानुसार स्थायी समिती सदस्य राष्ट्रवादी (अजित पवार गट)- गौरी बोरकर, सुरेश बनसोडे, हरप्रीतकौर गंभीर, संध्या पवार, मीना चोपडा, पौर्णिमा गव्हाळे, भाजप - सुभाष लोंढे, बाबासाहेब वाकळे, निखिल वारे, मनोज दुल्लम, मनोज कोतकर, सोनाबाई शिंदे, शिवसेना शिंदे गट - नवनाथ कातोरे, सुनिता गेनप्पा, काँग्रेस - खान मीनाज जाफर, एमआयएम -शेख शहनाज खालिद.

महिला व बालकल्याण समिती सदस्य - राष्ट्रवादी (अजित पवार गट)- दिपाली बारस्कर, सुनिता भिंगारदिवे, अनिता शेटीया, काजल भोसले, सुनिता कांबळे, अश्विनी लोंढे, भाजप - वंदना ताठे, शितल ढोणे, पुष्पा बोरुडे, आशाबाई कातोरे, रोशनी त्रिंबके, वर्षा सानप, शिवसेना शिंदे गट - मंगल लोखंडे, रूपाली दातरंगे, काँग्रेस -खान मीनाज जाफर, एम आय एम -शेख शेहनाज खालिद यांची निवड जाहीर करण्यात आली आहे.

या दोन्ही सभांसाठी महापौर ज्योती गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, आयुक्त यशवंत डांगे, अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुक्तेकर, नगर सचिव मेहेर लहारे यांच्या सह सर्व नगरसेवक उपस्थित होते.

# बारावीच्या विद्यार्थ्यावर लोखंडी रॉडने हल्ला; दोन अल्पवयीन मुलांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर - शहरातील न्यू आर्ट्‌स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स महाविद्यालयाच्या परिसरात परीक्षा बैठक क्रमांक पाहण्यासाठी गेलेल्या विद्यार्थ्यावर जुन्या वादातून लोखंडी रॉडने जीवघेणा हल्ला करण्यात आला. या घटनेत अतिष मनेश पारधे (वय १७, रा. मुन्सिपल कॉलनी, सिद्धार्थनगर) हा तरुण गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात दोन अल्पवयीन मुलांविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

अतिष हा बारावी वाणिज्य शाखेत शिकत असून २५ फेब्रुवारीला दुपारी आपल्या मित्रासोबत परीक्षेचा बाक क्रमांक पाहण्यासाठी महाविद्यालयात गेला होता. यावेळी त्याच महाविद्यालयातील एका ओळखीच्या अल्पवयीन मुलाने बुलेटवरून येत अतिषला कट मारला. यावरून झालेल्या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. संतापलेल्या त्या मुलाने आपल्या बॅगेतून लोखंडी रॉड काढून अतिषच्या डोक्यावर जोरात प्रहार केला. यावेळी त्याच्यासोबत असलेल्या दुसऱ्या एका मुलाने अतिषला पाठीमागून धरून ठेवले होते.

दोघांनी अतिषला लाथाबुक्क्यांनी मारहाण करत जमिनीवर पाडले आणि जीवे मारण्याची धमकी देऊन शिवीगाळ केली. जखमी अतिषला रक्ताच्या थारोळ्यात पाहून त्याच्या मित्राने तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल केले. पोलिसांनी दोन्ही अल्पवयीन आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस नाईक रमेश शिंदे करत आहेत.

## रमेश राऊत यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन



नगर - केडगाव (शाहूनगर) येथील रहिवासी रमेश बाळासाहेब राऊत (वय ५५) यांचे २३ फेब्रुवारी रोजी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. मूळगाव रुईछत्तीशी येथील असलेले श्री. राऊत हे गेल्या सुमारे तीस वर्षांपासून व्यवसायानिमित्त केडगाव येथे वास्तव्यास होते. परिसरात त्यांचा उत्तम जनसंपर्क होता. धार्मिक व सामाजिक कार्यात ते नेहमी सक्रिय सहभाग घेत असत. त्यांच्या पश्चात भाऊ, पत्नी, मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## सुरेखाबाई बोरा यांचे अल्प आजाराने निधन



नगर - घुमरेगल्ली येथील रहिवासी सुरेखाबाई बोरा (वय ७०) यांचे २६ फेब्रुवारी रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

हिंद सेवा मंडळाचे माजी विश्‍वस्त संपतलाल बोरा यांच्या त्या पत्नी, वसंत पेन्टस्‌चे वसंत बोरा यांच्या वहिनी तर शेखर गांधी यांच्या बहीण होत. त्यांच्या मागे पती, भाऊ, दीर, नातवंडे असा परिवार आहे.

## रवींद्र जोशी यांचे दीर्घ आजाराने निधन



नगर - पुणे येथील रहिवासी रवींद्र दिगंबर जोशी (वय ६३) यांचे २६ फेब्रुवारी रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर पुणे येथील नवीपेठ येथील वैकुंठधाम स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, २ भाऊ, भावजया, पत्नी, १ मुलगी, जावई असा परिवार आहे. रविंद्र हे रुपा यांचे पती तर डॉ. राजीव, चंद्रशेखर यांचे बंधू तसेच राधा यांचे वडील होत. मुद्रण व्यवसायात त्यांनी श्री जे युनायटेड प्रिंटर्सचे संचालक होत.

## विजयाबाई गांधी यांचे संथाराव्रतात निधन



नगर - खराडी गाव येथील रहिवासी विजयाबाई चंपालाल गांधी (वय ७१) यांचे सागरी संथाराव्रतात २६ फेब्रुवारी रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर खराडी गाव (पुणे) येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगी, जावई, नातवंडे, २ भाऊ, भावजया, पुतण्या असा परिवार आहे.

## रखमाबाई भापकर यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - गुंडेगाव येथील हराळ मळ्यातील रहिवासी रखमाबाई बाजीराव भापकर (वय ९७) यांचे २० फेब्रुवारी रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर हराळ मळा गुंडेगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. आदर्श सेंद्रीय आदर्श गोपालक प्रा. रंगनाथ भापकर व गुंडेगाव विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे चेअरमन रामदास भापकर यांच्या त्या मातोश्री होत.




हनुमान चालिसा पाठ

शुक्रवार दि. २७/०२/२०२६

रात्री ८.३० ते १०.३०

श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ, सर्जेपुरा, अहिल्यानगर

सतनाम साक्षी गोशाळा, कुष्ठधाम रोड, सहकारनगर, बारस्कर मळा, सावेडी, सुनील बजाज ९८५०९१५३७७

मंगल भक्त सेवा मंडळ, मंगल दत्तक्षेत्र, एम.आय.डी.सी.

अशोक हरिभाऊ जाधव, माऊली मंगल कार्यालय, न्यू टिळक रोड, सुरज जाधव ८८३०९३५४६३, योगेश जाधव ८९७५५१३३३१


मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# कचरा संकलनाचा बोजवारा, सर्वत्र ढिग, दुर्गंधी व आरोग्य धोक्यात; नागरिक त्रस्त, ठेकेदारावर तात्काळ दंडात्मक कारवाई करण्यात यावी

## ढिलाई करणाऱ्या कर्मचाऱ्यांना ठरवा भाग, जबाबदारी निश्चित करा : गणेश भोसले



नगर - गेल्या काही दिवसांपासून साफसफाईची दयनीय अवस्था निर्माण झाली आहे. कचरा वेळेवर उचलला जात नसल्याने सर्वत्र दुर्गंधी पसरली असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर नगरसेवक गणेश भोसले यांनी महापालिका प्रशासनाकडे ठेकेदारावर दंडात्मक कारवाई करण्याची मागणी केली आहे.

गणेश भोसले यांनी निवेदनात म्हटले आहे की, प्रभागातील साफसफाईचे काम सुसूत्र व्हावे यासाठी महापालिका प्रशासनाने प्रत्येक सफाई कर्मचाऱ्याला ठराविक भागाची जबाबदारी द्यावी. त्या भागात स्वच्छता न झाल्यास संबंधित कर्मचाऱ्यावर थेट कारवाई करता यावी. यामुळे नागरिकांना स्वच्छतेचा लाभ मिळेल आणि कामात जबाबदारी येईल. त्यांनी पुढे सांगितले की, सफाई कर्मचाऱ्यांनी गोळा केलेला कचरा ठेकेदाराकडून नियमित व वेळेवर उचलला जात नाही. परिणामी रस्त्यांवर कचऱ्याचे ढिग पडून राहतात. मोकाट जनावरे त्यात चरतात, तर वाऱ्यामुळे कचरा रस्त्यावर विखुरतो. त्यामुळे सर्वत्र दुर्गंधी पसरून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

अहिल्यानगर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक १४ १४ मधील बुरुडगाव रोड, चंदन इस्टेट, राज ज्योतीनगर, समर्थनगर, जुने आयटीआय गेट, भोसले आखाडा परिसर या भागांमध्ये हा प्रश्न गंभीर बनला आहे. अनेकदा तक्रारी करूनही ठेकेदाराकडून सुधारणा होत नसल्याने नागरिकांमध्ये संताप आहे.

सफाई ठेकेदाराविरुद्ध तातडीने दंडात्मक कारवाई करून कचरा संकलनाचे नियोजन काटेकोरपणे करावे. शहर स्वच्छ आणि निरोगी ठेवण्यासाठी जबाबदारीने काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन द्यावे, आणि ढिलाई करणाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी.

## कोठला झोपडपट्टी येथे कत्तलखान्यावर छापा

नगर - अहिल्यानगर शहरात बंदी असलेल्या गोमांसची सर्रासपणे विक्री होत असल्याचे समोर आले आहे. तोफखाना पोलिसांनी कोठला झोपडपट्टी भागातील एका पत्र्याच्या शेडमध्ये छापा टाकून १४ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी एका आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तोफखाना पोलीस स्टेशनचे पोलीस कॉन्स्टेबल सुजय विल्यम हिवाळे यांना शहरात गोमांसाची अवैध विक्री होत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी कोठला झोपडपट्टी परिसरातील कुरेशी हॉटेलच्या पाठीमागे असलेल्या एका पत्र्याच्या शेडमध्ये कारवाई केली. या ठिकाणी आरोपी जावेद पिरमोहम्मद सय्यद (वय ३२, रा. फकीरवाडा, मुकुंदनगर) हा गोमांस विक्री करण्याच्या उद्देशाने मिळून आला. पोलिसांनी या कारवाईत ७० किलो वजनाचे गोमांस, एक वजन काटा आणि लोखंडी सत्तूर असा एकूण १४ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. महाराष्ट्र राज्यात गोवंश हत्या आणि मांस विक्रीवर बंदी असतानाही हा प्रकार सुरू होता. याप्रकरणी तोफखाना पोलिसांनी भारतीय न्याय संहिता आणि महाराष्ट्र पशुसंवर्धन अधिनियमानुसार गुन्हा दाखल केला आहे. पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार विनोद गंगावणे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# अहिल्यानगर महानगरपालिकेकडून १४ मार्चपर्यंत मालमत्ता करावरील शास्तीमध्ये १०० टक्के सवलत

## बिगर सिंचन पाणीपट्टी, वीज बिलांसह सुमारे २३० कोटींची देणी थकीत, नागरिकांनी सवलतीचा लाभ घेऊन थकीत कराचा भरणा करावा : आयुक्त यशवंत डांगे

नगर - अहिल्यानगर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती सध्या चिंताजनक आहे. मालमत्ता कर व पाणीपट्टीची थकबाकी २४० कोटींपेक्षा अधिक आहे. गाळेधारकांची थकबाकीही ३० कोटींपेक्षा अधिक आहे. महानगरपालिकेला सुमारे २३० कोटी १५ लाख रुपयांची देणी आहेत. यात पाटबंधारे विभागाला देय असलेल्या बिगर सिंचनाच्या पाणीपट्टीसह महावितरणला पाणी योजनांसाठी देय असलेल्या देणींचा समावेश आहे. थकबाकीमुळे आर्थिक अडचणी निर्माण होऊन सेवा व सुविधांवर परिणाम होण्याचीही शक्यता आहे. त्यामुळे महानगरपालिकेने १४ मार्चपर्यंत मालमत्ता करावरील शास्तीमध्ये १०० टक्के सवलत देण्यात निर्णय घेतला आहे. नागरिकांनी या सवलतीचा लाभ घेऊन त्यांच्याकडे थकीत असलेल्या कराचा भरणा करावा व महानगरपालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त यशवंत डांगे यांनी केले आहे.

आयुक्त यशवंत डांगे यांनी महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीची माहिती देताना सांगितले की, जीएसटी अनुदान (११.७२ कोटी) आणि महसुली उत्पन्न (८ कोटी) असे मिळून दरमहा सरासरी १९ कोटी ७२ लाख रुपये महानगरपालिकेत जमा होतात. मात्र, कर्मचारी वेतन, निवृत्तीवेतन, पाणी योजना व पथदिव्यांची वीज बिले आणि इतर अत्यावश्यक सेवांचा मासिक खर्च सुमारे २४ कोटी ४० लाख रुपयांवर गेला आहे. यामुळे दर महिन्याला महानगरपालिकेला ४ कोटी ६८ लाख रुपयांचा तुटवडा भासत असून देणीही वाढत आहेत. सद्यस्थितीत महानगरपालिकेला २३० कोटींची देणी आहेत. यात कर्मचारी ७ वा वेतन आयोग फरक १०७ कोटी, विकास कामांची देयके ८० कोटी, कुत्र्यांचा बंदोबस्त करणे ५० लाख, विविध योजनांचा मनपा हिस्सा ५० कोटी, पाणी पुरवठा वीज बिल १६.८५ कोटी, इतर देयके ९ कोटी, न्यायालयीन प्रलंबित देयके ९ कोटी, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी (PF) रक्कम ७ कोटी, पुरवठादार देयके ४ कोटी, अशुद्ध पाणी आकार ४ कोटी, वेतन कपात रक्कम ३.५० कोटी. ६ वा वेतन आयोग फरक ३.०० कोटी, ५ वा वेतन आयोग फरक २ कोटी, सेवा उपदान रक्कम २ कोटी, परिभाषित निवृत्तीवेतन हिस्सा १.७५ कोटी, अर्जित रजा वेतन रक्कम ७५.०० लाख, कर्मचारी वैद्यकीय प्रतिपूर्ती देयके ५०.०० लाख, स्ट्रीट लाईट वीज बिल ४८.०० लाख आदींचा समावेश आहे.

महानगरपालिकेचे उत्पन्नाचे प्रमाण कमी आणि अत्यावश्यक सेवांचा खर्च जास्त असल्याने आर्थिक नियोजन करताना मोठी कसरत करावी लागत आहे. वाढत्या कराच्या थकबाकीमुळे दंडाची रक्कमही वाढत आहे. परिणामी महानगरपालिकेसह नागरिकांवरही दंडाचा बोजा पडत आहे. या सर्वांचा विचार करून नागरिकांना कराच्या थकबाकी वरील शास्तीमध्ये १४ मार्चपर्यंत १०० टक्के सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यासाठी थकबाकीदारांना थकीत कर एकरकमी जमा करावा लागणार आहे. थकबाकीदार नागरिकांनी या सवलतीचा लाभ घेऊन त्यांच्याकडे थकीत असलेल्या कराचा भरणा तत्काळ करावा, असे आवाहन आवाहन आयुक्त डांगे यांनी केले आहे.

दरम्यान, महानगरपालिकेकडून दरवर्षी शास्तीमध्ये सवलत जाहीर करत आहे. तरीही अनेक थकबाकीदार मालमत्ताधारक मालमत्ता कर व पाणीपट्टीची थकबाकी भरण्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहेत. आता पुन्हा शास्तीमध्ये सवलत देण्यात आली असून, थकबाकीदारांनी याचा लाभ घेऊन थकीत कर भरावा. अन्यथा येत्या काळात महानगरपालिकेला नाईलाजाने थकबाकीदारांवर जप्ती, नळ कनेक्शन तोडून पाणी पुरवठा बंद करणे, अशा कारवाया कराव्या लागतील, असा इशाराही आयुक्त यशवंत डांगे यांनी दिला आहे.

# विवाहितेच्या आत्महत्येप्रकरणी पतीसह तिघांवर गुन्हा दाखल

नगर - नगर तालुक्यातील निंबोडी परिसरात एका विवाहितेने सासरच्या छळाला कंटाळून विहिरीत उडी घेत आपली जीवनयात्रा संपवल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी कॅम्प पोलीस ठाण्यात पतीसह सासू आणि सासऱ्यावर गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

निंबोडी शिवारातील जयराम बेरड यांच्या विहिरीत २४ फेब्रुवारी रोजी अंतरा सागर आवारे या विवाहितेचा मृतदेह आढळला होता. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली होती. मात्र मयत विवाहितेचा भाऊ दत्तात्रय चंद्रकांत गाडेकर (रा. निंबोडी, ता. नगर) याने २५ फेब्रुवारीला फिर्याद दिली असून मयत महिलेला तिचे पती सागर बाबासाहेब आवारे, सासरे बाबासाहेब लहानु आवारे आणि सासू मंदा बाबासाहेब आवारे हे सतत शारीरिक व मानसिक त्रास देत होते. सासरच्या मंडळींकडून होणाऱ्या या सततच्या त्रासामुळे आणि छळामुळे पीडिता अत्यंत तणावाखाली होती. अखेर या छळाला कंटाळून तिने विहिरीत उडी मारून आत्महत्या केली असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. या फिर्यादी वरून भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम १०८ आणि ३ (५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर हे करत आहेत.

# गृहिणी

## आरोग्य

### ऑफीसमध्ये करा सोपा व्यायाम

ऑफिसमध्ये तासनतास बसून काम करताना पाठदुखी ही खूप सामान्य समस्या आहे. चुकीची बसण्याची पद्धत, सतत एकाच स्थितीत राहणे यामुळे पाठीचे स्नायू आखडतात, ताण येतो आणि वेदना होतात. पण चांगली बातमी ही आहे की, दररोज फक्त ५ मिनिटे काही सोपे स्ट्रेचिंग आणि व्यायाम केल्याने खूप आराम मिळतो आणि दीर्घकाळासाठी सुटका मिळू शकते. हे व्यायाम खुर्चीवर बसूनच करता येतात, कोणतेही उपकरण लागत नाही आणि ऑफिसमध्ये सहज करता येतात. रोज २-३ वेळा (उदा. सकाळ, दुपार, संध्याकाळ) हे करा. खुर्चीच्या काठावर सरळ बसून पाय जमिनीवर सपाट ठेवा. उजवा हात खुर्चीच्या मागच्या बाजूला किंवा डाव्या गुडघ्यावर ठेवा. डाव्या बाजूला हळूहळू शरीर फिरवा, डोके आणि मान देखील त्याच दिशेने. २०-३० सेकंद धरून ठेवा, खोल श्वास घ्या. दुसऱ्या बाजूला करा. प्रत्येक बाजूला २-३ वेळा. पाठीची लवचिकता वाढते, ताण कमी होतो. खुर्चीवर सरळ बसून दोन्ही हात गुडघ्यांवर ठेवा. श्वास घेताना छाती पुढे काढा, खांदे मागे, डोके वर श्वास सोडताना पाठ गोल करा, मान खाली ८-१० वेळा हळूहळू करा. पाठीचा कणा मोकळा होतो, खालच्या पाठीची वेदना कमी होते.

## पाककला

### सोलापूरी शेंगदाणा भाजी

**साहित्य :** शेंगदाणे: १ मोठी वाटी (चांगले खमंग भाजून घेतलेले), काळा मसाला (सोलापुरी): २ मोठे चमचे (तुमच्या आवडीनुसार कमी-जास्त), लसूण-आलं पेस्ट: १ मोठा चमचा (लसूण जास्त वापरावा) खोबरं: २ चमचे किसलेले सुके खोबरे (भाजून घेतलेले) फोडणीसाठी: ३-४ मोठे चमचे तेल (तररीसाठी तेल थोडे जास्त लागते), मोहरी, जिरे, कढीपत्ता. इतर: चवीनुसार मीठ, कोथिंबीर आणि गरम पाणी.

**कृती :** वाटण तयार करा: भाजलेले शेंगदाणे, भाजलेले खोबरे आणि लसूण हे सर्व एकत्र करून मिक्सरला फिरवून घ्या. सोलापुरी पद्धतीत हे वाटण एकदम गुळगुळीत न करता थोडे दाणेदार ठेवले जाते.

फोडणीची तयारी: कढईत तेल चांगले गरम करा. तेल तापल्यावर मोहरी, जिरे आणि कढीपत्ता टाकून तडतडू द्या.

मसाला परता : आता तयार केलेले शेंगदाणे-खोबरं-लसणाचे वाटण तेलात टाका. हे वाटण मंद आचेवर १-२ मिनिटे परता. त्यानंतर त्यात सोलापुरी काळा मसाला आणि चिमूटभर हळद टाका. मसाल्याला तेल सुटेपर्यंत परता. गरम पाण्याचा वापर (महत्वाची टीप): मसाला परतल्यावर त्यात कडकडीत गरम पाणी ओता. गरम पाण्यामुळे भाजीला 'तररी' किंवा 'कट' खूप छान येतो. तुम्हाला जितपत रस्सा हवा आहे, तितके पाणी वाढवा. उकळी आणि शिजवणे: चवीनुसार मीठ टाका आणि भाजीला चांगली उकळी येऊ द्या. उकळी आल्यावर गॅस बारीक करा आणि ५-७ मिनिटे भाजी शिजू द्या. यामुळे तेलाचा लाल थर वर तरंगू लागेल. फिनिशिंग: वरून बारीक चिरलेली कोथिंबीर पेरा.

## वास्तू

### ड्रेस कसा असावा?

दररोज स्वच्छ कपडे घाला, कारण घाणेरडे कपडे शुक्र ग्रहावर नकारात्मक प्रभाव पाडतात. यामुळे शुक्र ग्रहाचा शुभ प्रभाव कायम राहतो आणि इतर ग्रह देखील शुभ प्रभाव देऊ लागतात. तुमचे कपडे फाटलेले नसावेत. यामुळे गरिबी निर्माण होते. ड्रेसचा रंग आकर्षक किंवा लक्षवेधी नसावा.

## सौंदर्य

एरंडेल तेल किंवा नारळ तेलाने मुळांना मसाज केल्याने केसांना पोषण मिळते.

## सल्ला

* लिंबूला बाहेरुन तेलाचा हात लावून फ्रिजमध्ये ठेवल्यास लिंबे जास्त दिवस टिकातात. * बटाटे उकडताना त्यात थोडी हळद टाकल्यास बटाटे जास्त काळ टिकतात.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. २७ फेब्रुवारी २०२६

**आमलकी एकादशी, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, फाल्गुन शुक्लपक्ष, आर्द्रा १०।४९, सूर्योदय ०६ वा. ४१ मि. सूर्यास्त ०५ वा. ३२ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : पैसा खर्च होईल. संतती बरोबर मतभेद किंवा त्यांच्या चिंतेत मन व्यग्र राहील. सामाजिक क्षेत्रात अपयश येणार नाही याकडे लक्ष द्या.

**वृषभ** : नवीन कामाची सुरूवात करण्याला अनुकूल दिवस. मित्रांबरोबर दिवस आनंदात घालवाल. मागील देणी वसुल होतील.

**मिथुन** : विद्यार्थ्यांना आज अभ्यासात रस वाटणार नाही. शेअर्समध्ये गुंतवणूक करू शकाल. आध्यात्मिकतेतून शांती मिळेल.

**कर्क** : मित्र आणि कुटुंबीय यांच्याबरोबर आनंदात दिवस घालवाल. प्रवास, सहली यातूनही आज आनंद मिळवू शकता.

**सिंह** : आध्यात्मिकतेच्या मदतीने विचारातील नकारात्मकता दूर करा. मनाच्या एकाग्रतेमुळे सर्व कामात फायदा होईल.

**कन्या** : स्वकीयांचा वियोग घडू शकतो. कुटुंबातील लोकांशी मतभेद संभवतात. मिळणाऱ्या फायद्यात नुकसान होणार नाही याकडे लक्ष द्या.

**तूळ** : देण्या-घेण्याचे निर्णय विचारपूर्वक घ्या. अपघात व गैरसमज यापासून दूरच राहा. वाहने सावकाश चालवावीत.

**वृश्चिक** : शारीरिकस्वास्थ्य बिघडू शकते. विनाकारण खर्च होईल. मागील उधारी उसनवारी वसुल होईल.

**धनु** : आज अध्यात्माकडे कल राहिल. जुने मित्र व नातेवाईक यांच्या सहवासामुळे दिवस आनंदात व्यतीत होईल. तब्येत सांभाळा.

**मकर** : उतावीळ स्वभावावर नियंत्रण ठेवून कार्ये शांततेत केल्यास आजचा दिवस हा यशदायी ठरेल. उधारी वसुल होईल.

**कुंभ** : हितशत्रूंपासून पिडा संभवते. संततीसौख्य लाभेल. कोर्ट-कचेरी आदी गोष्टींपासून लांब रहा.

**मीन** : आर्थिक व्यवहार करताना अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नका. मागील उधारी वसूल होईल.

## फिल्मीचक्कर क्र. १२२६ सौ. शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | ■ |
| | ■ | ■ | ■ | ■ | ■ | ■ | २ |
| | ■ | ३ | | ४ | | ५ | |
| ६ | | | ■ | | ■ | | ■ |
| | ■ | ■ | ७ | | ■ | | ■ |
| ८ | ९ | | ■ | ■ | ■ | ■ | १० |
| ■ | | ■ | ११ | | १२ | | |
| १३ | | | | ■ | | ■ | |

**आडवे शब्द :-** १) एक नेपाळी अभिनेत्री जी कर्करोगाच्या तावडीतून सुखरूप सुटली ३) ++ ++ ++ +++ कांटा ना लगे कंकर (गाणे) ६) मिस्टर +++ (चित्रपटाचे नाव) ७) आखरी ++ (चित्रपटाचे नाव) ८) अमिताभ बच्चन, नितू सिंग, अमजदखान यांचा एक चित्रपट ११) देव आनंद, वहिदा रहेमान यांचा एक चित्रपट १३) संत ++++ (मराठी चित्रपटाचे नाव)

**उभे शब्द :-** १) राजकुमार, सुनील दत्त, नर्गिस यांचा एक गाजलेला चित्रपट २) ++ स्टोरी (चित्रपटाचे नाव) ३) ++ बच्चन (अभिनेत्री) ४) अमजदखानच्या अभिनेता वडिलांचे नाव ५) धर्मेंद्र, आशा पारेख, संजीवकुमार, जॉनी वॉकर, रमेश देव; हेलन; रहेमान यांचा एक चित्रपट ९) +++ समा झूमे चंद्रमा तन मोरा नाचे रे जैसे (गाणे) १०) अमीर +++ (चित्रपटाचे नाव) ११) ++ चोप्रा (खलनायकी करणारा नट) १२) अमरीश ++ (दिवंगत खलनायक)

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** समाधान असेल तरच पैसा सुख देतो नाही तर कितीही कमवला तरी कमीच पडतो.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### नात्यातील नकारात्मकता घालवण्याचा दिवस म्हणजे 'किक डे'

'किक डे' हा अँटी-व्हॅलेंटाईन विकमधील दुसरा महत्त्वाचा दिवस आहे. व्हॅलेंटाईन विकमध्ये प्रेमाचा वर्षाव झाल्यानंतर, हा आठवडा नकारात्मक गोष्टींना आयुष्यातून बाहेर काढण्यासाठी ओळखला जातो. व्हॅलेंटाईन वीकचे कौतुक आता कमी झाले आहे आणि आता अँटी-व्हॅलेंटाईन वीकद्वारे तुमचे जीवन ताजेतवाने करण्याची वेळ आली आहे. १५ फेब्रुवारी रोजी थप्पड मारण्याचा दिवस साजरा केल्यानंतर, आता १६ फेब्रुवारी म्हणजेच किक डे अनेकांना वाटते की हा दिवस फक्त मजा आणि मजा करण्यासाठी आहे, परंतु प्रत्यक्षात तो तुमच्या जोडीदाराबद्दल नाही तर तुमच्या आयुष्यातील त्या वाईट सवयी आणि जुन्या आठवणी काढून टाकण्याबद्दल आहे ज्या तुम्हाला पुढे जाण्यापासून रोखत आहेत. जर तुम्हीही जुनी कटुता धरून असाल, तर जाणून घ्या हा दिवस तुमच्यासाठी इतका महत्त्वाचा का आहे आणि या किक डे वर तुम्ही एक नवीन आणि अद्भुत सुरुवात कशी करू शकता. लोक अनेकदा किक डे चा गैरसमज करतात, पण हा दिवस तुमचे जीवन स्वच्छ करण्याचा आहे. याचा अर्थ असा आहे की तुमच्या आयुष्यातून तुम्हाला तणाव निर्माण करणाऱ्या कोणत्याही गोष्टीला बाहेर काढा. मग ते वाईट नातेसंबंध असो, तुम्हाला त्रास देणारी आठवण असो किंवा तुमची स्वतःची वाईट सवय असो. हा दिवस दरवर्षी १६ फेब्रुवारी रोजी साजरा केला जातो.

'किक' या शब्दाचा अर्थ जरी 'लाथ मारणे' असा असला, तरी या दिवसाचा उद्देश कोणाला शारीरिक इजा करणे नाही. याचे प्रतीकात्मक अर्थ खालीलप्रमाणे आहेत. तुमच्या आयुष्यातील वाईट सवयी, दुःख आणि नकारात्मक विचार यांना लाथ मारून दूर करणे. विषारी नात्यातून बाहेर पडणे: जर एखादे नाते तुम्हाला फक्त त्रास देत असेल, तर अशा 'टॉक्सिक' नात्याला आणि त्या व्यक्तीच्या आठवणींना आयुष्यातून कायमचे बाहेर काढण्याचा हा दिवस आहे.

स्वातंत्र्याचा आनंद: दुखातून बाहेर पडून मोकळा श्वास घेणे आणि स्वतःसाठी जगणे.

हा दिवस कसा साजरा करतात?

१. आठवणींना पूर्णविराम: जुन्या जोडीदाराने दिलेल्या वस्तू किंवा भेटवस्तू फेकून देऊन किंवा कोणाला तरी दान करून मनातून तो विषय संपवणे.

२. स्वतःमध्ये बदल करणे: नवीन ध्येय निश्चित करणे आणि स्वतःच्या प्रगतीवर लक्ष केंद्रित करणे.

३. मजेशीर संदेश: मित्र-मैत्रिणींमध्ये चेष्टा म्हणून एकमेकांना 'किक डे' चे मीम्स आणि मेसेज पाठवले जातात.

या किक डे ला तुमच्या आयुष्यातून या ३ गोष्टी काढून टाका

जुन्या गप्पा आणि कटू आठवणी : जर तुम्हाला रात्रीच्या वेळी जुन्या मेसेजमुळे अजूनही दुःख होत असेल, तर ते कायमचे डिलीट करण्याचा हा दिवस आहे. जोपर्यंत तुम्ही जुन्या आठवणींना बाजूला करत नाही तोपर्यंत आयुष्यात नवीन आनंदांसाठी जागा राहणार नाही.

कामात दिरंगाई करण्याची सवय : जर तुम्हाला उद्यावर सगळं ढकलायचं असेल तर आजच ही सवय सोडा. तुमचे आयुष्य सुधारण्यासाठी आणि तुमच्या करिअरवर लक्ष केंद्रित करण्यासाठी हे खूप महत्वाचे आहे.


स्वतःला कमी लेखणे : ब्रेकअपनंतर, लोक अनेकदा स्वतःमध्येच दोष शोधतात. या किकस्टार्टर डे वर, तुमच्या आयुष्यातून हा विचार काढून टाका आणि स्वतःवर प्रेम करायला सुरुवात करा.

## चतुर आजीबाई

अनेक वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. पावसाळ्याचे दिवस होते. आजूबाजूला पाणी साचत होते. जंगलातील वृद्ध आजीबाईचे घर भिजत होते. वृद्ध आजीबाईचे घर टपकायला लागताच, वृद्ध आजीबाई काळजीत पडली. पण ती काहीही करू शकत न्हवते? छत कोण झाकणार?

आता थोड्या वेळाने गाराही पडू लागल्या. मनुका इतक्या मोठ्या गारपिटी होत्या. गारपिटीमुळे एक वाघ अस्वस्थ झाला. उड्या मारत मारत तो वृद्ध आजीबाईच्या घरी पोहोचला. वृद्ध आजीबाई भात शिजवत होती. वृद्ध आजीबाईला पाहून वाघाला आनंद झाला. त्याने मनात विचार केला की, अरे वा! माझी जेवणाची सोय झाली. आता वाघ घरात शिरल्याची आजीबाईला चाहूल लागली. ती विचार करू लागली की, ती वाघाशी झुंज कशी देणार?, मग तिने एक युक्ती केली. घरात छतावरून पाणी पडत होते. व त्याचा टपक टपक असा आवाज येत होता. ती मोठ्याने घाबरत म्हणाली मला वाघाची भीत वाटत नाही तेवढी या टपक टपकची वाटते. आता मात्र वाघ मनात पुटपुटला तर आजीबाई मला घाबरत नाही आणि या टपक टपकला घाबरते म्हणजे कोणीतरी नकीच माझ्या पेक्षा मोठा प्राणी असेल. असा विचार करून वाघ घाबरला आणि पळून गेला. आजीबाई मात्र खुश झाली.

तात्पर्य : संकटाच्या वेळी नेहमीच हुशारीने वागले पाहिजे.



## जीवन का अमृत (भाग १)

सब निर्भर करता है, नामलेवा की पृष्ठ भूमि पर और उस लगन, प्रेम और भक्ति पर, जो वह आध्यात्मिक अभ्यास में लगाता है। दिव्य खजाने सभी के लिए हैं, चाहे अमीर हो या गरीब। सत्गुरु की प्रेममयी सहायता उन्नति को तेज कर देती है ।

२०. अपने साथियों से प्रेम करना, उनका आदर करना और उनके प्रति कृतज्ञ होना, प्रभु को प्रेम करना और उसका आदर करना है। इसी प्रकार, जिंदा सत्गुरु के प्रति प्रेम, जो कि हमें प्रभु से जोड़ने वाली निकटतम कड़ी है, वास्तव में परम पिता के प्रति प्रेम है। इसका अंत रूहानियत है, न कि मूर्ति पूजा । जिस वातावरण में एक सच्चा सत्गुरु विचरण करता है, वह प्रेम और शांति की तरंगों से भरपूर होता है और यह उसके संपर्क में आने वालों को प्रभावित करता है। उसके द्वारा या उसकी ओर से लिखे गए पत्र भी परमानंद की खुशबू लिए होते हैं, जोकि हृदय की गहराइयों तक अपना असर छोड़ जाते हैं। गुरु प्रभु से पहले आता है।

### निकटतम कडी

२१. सत्गुरु सदा दृढ़ विश्वास के साथ बोलता है, क्योंकि उसने हर वस्तु का ज्ञान स्वयं पाया होता है और ऐसा उसे प्रभु से एकमेक होने की वज़ह से मिलता है। २२. पवित्र नाम या दिव्य शब्द के साथ जुड़ना और उसके प्रताप का ध्यान करना, प्रभु को पाने का जादुई तरीका है। शब्द वह शक्ति है, वह तत्व है, जिससे समस्त जीवन का निर्माण हुआ। इसकी मग्न कर देने वाली धुन से पवित्र गठबंधन की दात केवल जिंदा सत्गुरु के द्वारा ही मिल सकती है । उसकी संगति में पवित्र प्रेरणा का जीवन और प्रभु के प्रति प्रेम बनता है और आंतरिक आँख खोल दी जाती है, ताकि हर वस्तु में प्रभु का वास दिखने लगे । एक सच्चा सत्गुरु सिर्फ एक इंसान नहीं है, बल्कि वह प्रभु से एकमेक हो चुका है और इसलिए उसमें सभी देवी-देवताओं की शक्तियाँ निहित हैं। वह वास्तव में शब्द मुजस्सम है। जो पाठ ऐसा सत्गुरु अपने शिष्यों को पढ़ाता है, वह है : हमेशा प्रभु का ध्यान करना, जो कि हर वस्तु को बनाने वाला है और उसे कभी न भूलना। २३. सत्गुरु सदा अपने भक्त के साथ रहता है, चाहे वह कहीं भी हो।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### सिर्फ विचार समझ जाइये

अगर आप नास्तिक हैं या किसी भी दूसरे धर्म को मानते हैं। आप अपने इष्ट को मन में देखते रहें या उस का चित्र देखते रहें। आप हर रोज शांति, प्रेम, सुख और आनन्द या सकारत्मक चिन्तन पर २० पेज पढ़ते रहें और जब तक जीवित हैं तब तक पढ़ने हैं। आप में वह सब गुण आ जायेंगे जो एक महान योगी में होते हैं।

आप इस समय चाहे केसी भी समस्या, तन, मन, धन या संबंधो से गुजर रहें हैं, तुरंत अव्यक्त मुरली या साकारत्मक चिन्तन पर २० पेज पढो और हर रोज पढो सब कुछ ठीक हो जायेगा।

निवेदन

सहस्त्रार चक्र १० से सहस्त्रार चक्र २८ में दिए गये विचार तथा और भी कई जगह इस अध्याय में लिखे गये विचार मैंने अपने अनुभव और विवेक से लिखे हैं। इन पर शोध की जरूरत है। इसे फिलहाल सिर्फ मेरे विचार मात्र समझा जाये। आप अपना कर के देखना, अच्छा लगे तो अपना लेना, नहीं तो छोड़ देना।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

**(समाप्त)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

पेशंट : डॉक्टरसाहेब, माझ्या अंगाला ना खूप खाज सुटते. काहीतरी औषध द्या.
डॉक्टर: हे घ्या, यावरच्या गोळ्या नियमित घ्या.
पेशंट: पण यामुळे माझ्या अंगाची खाज नक्की जाईल ना?
डॉक्टर : (रागावून) नाही, तुमच्या हाताच्या बोटांची नखं वाढवण्यासाठी दिलीत ही औषधं.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* आशियाई स्नूकर अजिंक्यपद स्पर्धा कोठे पार पडली आहे?

– दोहा (कतार)

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद – आरोग्य संवर्धन

सावधानता :

हिवाळ्यामध्ये सर्दी, खोकला, ताप हे आजार झाले असतील, तर फ्रीजमध्ये ठेवलेले थंड आवळे सेवन करू नये. तसेच परिपक्व न झालेले कच्चे आवळे खाऊ नयेत. यामुळे वरील आजाराची लक्षणे अजूनच वाढतात. याशिवाय आवळा कुठल्याही स्वरूपात शरीरास रसायनाप्रमाणे उपयुक्तच आहे.

"n wala a day keeps the doctor away' जर नियमितपणे रोज आवळा किंवा त्याचे पदार्थ सेवन केले, तर तुम्हाला डॉक्टरांची गरज भासणार नाही.

### देशी आंबा

फळांचा राजा म्हणून आंबा ओळखला जातो. त्याच्या आंबट-गोड चवीने व रसाळ गुणधर्मामुळेच त्याला फळांचा राजा असे म्हणतात. लहानांपासून वयोवृद्धांपर्यंत आंबा सर्वांनाच आवडतो. मराठीत 'आंबा', हिंदीमध्ये 'आम', इंग्रजीमध्ये 'मँगो', संस्कृतमध्ये 'आम्र', तर शास्त्रीय भाषेत 'मॅन्जिफेरा इंडिका' (चरपसळषशीर खपवळलर) म्हणून आंबा परिचित आहे.

आंबा हा 'नाकार्डिअसी' कुळातील आहे. तोतापुरी, हापूस, पायरी, उत्तरप्रदेशातील दशेरी, नीलम अशा अनेक वेगवेगळ्या जातींनुसार त्याचा आकार, रंग व चव थोडीफार बदलते. आंबा हा आहार व औषध अशा दोन्ही दृष्टींनी बहुमोल आहे.

जंगलात नैसर्गिकपणे उगविणाऱ्या आंब्याला जंगली आंबा किंवा रान आंबा असे म्हणतात. शेतामध्ये किंवा बागेत कोय रोपून जी झाडे तयार केली जातात, त्याला 'देशी आंबा' असे म्हणतात. तर उत्तम जातीच्या आंब्यावर कलम करून जे झाड तयार करण्यात येते, त्याला 'कलमी आंबा' असे म्हणतात. सर्वोत्तम आंबा कोणाला म्हणावे याबद्दल दुमते आहेत. तरीही सामान्यतः केशर आंब्याला प्रथम क्रमांक दिला जातो. सर्व आंब्यामध्ये चांगला आंबा कोणता, या प्रश्नामध्ये अडकून राहण्यापेक्षा आपल्या परिसरात निर्माण होणारा आंबा आपल्या शरीराच्या आरोग्यासाठी हितकारक असतो. आंबा नेहमी ताजा खावा व शक्यतो आंबा कापून खाण्यापेक्षा चोखून खावा. कारण कापून खाल्लेला आंबा हा पचनास जड, तर चोखून खाल्लेला आंबा हा पचण्यासाठी सुलभ व हलका असतो. सहसा आंबा हिरवट पिवळा, गुलाबी पिवळा व हिरवा अशा रंगांमध्ये पाहावयास मिळतो. लखनवी आंबा फक्त पांढऱ्या रंगाचा असतो.

औषधी गुणधर्म : कैरी व आंबा या दोन्ही अवस्थांमध्ये या फळात औषधी गुणधर्म सापडतात.

आयुर्वेदानुसार : कैरी ही आम्लधर्मी स्तंभक आहे, तर कैरीची साल ही कषायगुणात्मक व उत्तेजक असते. पिकलेला आंबा हा मधुर, स्निग्ध, सुखदायक, बलदायक, पचायला जड, वायुहारक, हृदय, थंड, शरीराची कांती वाढविणारा, जठराग्नी प्रदीप्त करणारा व कफवर्धक असतो.

आधुनिक शास्त्रानुसार : आंब्यामध्ये कॅल्शिअम, लोह, फॉस्फरस, 'क' जीवनसत्त्व, तंतुमय पदार्थ, प्रथिने, आर्द्रता, मेद, पिष्टमय पदार्थ ही घटकद्रव्ये असतात.

उपयोग : १) आंबा खाण्यापूर्वी तो थोडा वेळ थंड पाण्यात भिजू द्यावा. पाण्यात भिजविल्यामुळे त्याचे बाह्य अंग पूर्णपणे स्वच्छ करता येते. त्याच्या तोंडाजवळ असणारा चीक व्यवस्थित काढून टाकता येतो. चीक व्यवस्थित निघाल्यामुळे आंब्याच्या अवीट गोडीचा आनंद उपभोगता येतो.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



पत्रकार चौक ते बोल्हेगाव फाटा या मार्गावर १४० नवीन पथदिवे बसविण्यात आले असून, या कामाचा लोकार्पण सोहळा आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते पार पडला. (छाया – लहू दळवी)

# पत्रकार चौक ते बोल्हेगाव फाटा मार्गावरील पथदिवे कामाचा अहिल्यानगर महानगरपालिकेच्यावतीने 'लोकार्पण सोहळा'

### नवीन पथदिव्यांमुळे महामार्ग उजळणार; सुरक्षित प्रवास आणि व्यापारीकरणाला चालना मिळणार : आमदार संग्राम जगताप

नगर – अहिल्यानगर महानगरपालिकेच्या माध्यमातून नागरी दलितेतर वस्ती सुधार योजना अंतर्गत पत्रकार चौक ते बोल्हेगाव फाटा या मार्गावर १४० नवीन पथदिवे बसविण्यात आले असून, या कामाचा लोकार्पण सोहळा आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते पार पडला. या कार्यक्रमाला महापौर ज्योतीताई गाडे, आयुक्त यशवंत डांगे, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, माजी उपमहापौर गणेश भोसले, नगरसेवक अविनाश घुले, सुरेश बनसोडे, प्रकाश भागानगरे, अजिंक्य बोरकर, ऋग्वेद गंधे, बाळासाहेब पवार, रामदास आंधळे, डॉ. सागर बोरुडे, महेश लोंढे, दत्ता गाडळकर, अजय ढोणे, महेश तवले, नगरसेविका पुष्पाताई बोरुडे, वर्षा सानप, सोनाबाई शिंदे, सुजाता पडोळे, दगडू मामा पवार, शहर अभियंता मनोज पारखे, गजेंद्र भांडवलकर, सचिन जगताप, सतीश शिंदे, सुधीर लांडगे उपस्थित होते.

या प्रसंगी आमदार संग्राम जगताप म्हणाले की, अहिल्यानगर शहराचा विकास झपाट्याने होत आहे. आता शहर दोन भागांत विभागले गेले असून उपनगरांमध्ये नागरिक वास्तव्यासाठी मोठ्या प्रमाणात येत आहेत. पत्रकार चौक, माऊली चौक, प्रेमदान चौक, सावेडी नाका आणि बोल्हेगाव फाटा या मार्गावर मुंबईच्या धरतीवर नवीन पोल आणि दिवे बसविण्यात आले आहेत. त्यामुळे हा संपूर्ण महामार्ग उजळणार असून नागरिकांना सुरक्षित प्रवासाची सोय उपलब्ध होईल. ते पुढे म्हणाले, या महामार्गाच्या उजळणीमुळे व्यापारीकरणालाही चालना मिळेल आणि शहराच्या वैभवात भर पडेल. नागरिक आणि प्रशासन यांच्या एकत्रित प्रयत्नांतूनच अहिल्यानगर अधिक आधुनिक आणि सुंदर बनवू शकतो.

आयुक्त यशवंत डांगे म्हणाले, या नागरी दलितेतर वस्ती सुधार योजनेतून एकूण १४० नवीन पथदिवे बसविण्यात आले आहेत. या पोलवर कोणत्याही प्रकारचे पोस्टर, फ्लेक्स किंवा डिजिटल केबल लावू नयेत. असे आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करून गुन्हा दाखल केला जाईल. ते पुढे म्हणाले की, महापालिकेचे उद्दिष्ट फक्त विकास नव्हे, तर स्वच्छ, सुंदर आणि हरित शहर निर्माण करणे आहे. नागरिकांनी सहकार्य केल्यास हे शहर राज्यातील आदर्श शहर बनेल.

ज्योतीताई गाडे यांनी सांगितले की, महापालिकेच्या माध्यमातून शहरातील प्रत्येक वॉर्डात पायाभूत सुविधा उभारल्या जात आहेत. नागरिकांच्या सोयीसाठी अनेक विकासकामे मंजूर करण्यात आली असून, नगरकरांच्या सहकार्याने ती वेळेत पूर्ण केली जातील.

धनंजय जाधव म्हणाले, महापालिकेचे काम हे लोकसहभागाशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. नगरकरांनी विकासकामांसाठी पुढाकार घेतला पाहिजे. नगरसेवक, अधिकारी आणि नागरिक यांच्या संयुक्त प्रयत्नांतूनच शहराचा कायापालट शक्य आहे.

# प्रेरणादायी अक्षरधन

### गावगाड्यातील लोकरंग

"मुसाफिर" वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन संकलन: दिशान फिचर्स

समाज मनाला सुखावणारी चैतन्य पालवी डॉ. रामचंद्र देखणे 'चपराक' प्रकाशित ललित चिंतन

भारतीय संस्कृती आणि लोकजीवनातील प्रत्येक सण हा एकीकडे आध्यात्मिक आणि धार्मिक तत्त्वाने जोडला आहे तर दुसरीकडे मुक्त आनंदाचा लोकोत्सव म्हणून तो उत्साहात साजरा होतो आहे. उत्सवांचे नियोजनही ऋतुमानाप्रमाणे आणि निसर्ग घटकांच्या ऋतुचक्राप्रमाणे केले गेले आहे. चैत्रात वसंत ऋतू येतो तो चैतन्याची अनुभूती घेऊनच. या वसंत आगमनाच्या स्वागतासाठी 'वसंत आगमनोत्सव' म्हणून होळीचा सण साजरा होतो. या उत्सवाचे रूप पाहता हा सण मूलतः अगदी लौकिक पातळीवरचा असून, नंतर त्यात कालांतराने धार्मिक व सांस्कृतिक विधी विधानांची भर पडून त्याचे स्वरूप तयार झाले.

होलिकोत्सव म्हणजे होळी, धुलिकोत्सव म्हणजे धुळवड आणि रंगोत्सव म्हणजे रंगपंचमी या तिन्हीचे एकत्रीकरण होऊन या लोकोत्सवाच्या अंगाने होळी पौर्णिमेपासूनच रंग, ढंग आणि शृंगाराची उधळण होते. शेतातले पीकपाणी घरी आलेले असते. गावातील उरूस, जत्रांना सुरुवात होते. होळी पेटल्यानंतर तर मनसोक्तपणे बोंब मारायला पूर्ण मुभा असते. गंभीर तत्त्वज्ञान, सात्विक आदर्शवाद या साऱ्यांना क्षणभर बाजूला ठेवून एक वेगळीच धुंदी गावगाड्यात अवतरते. राजस वृत्तीचे सारे खेळ, लीला, क्रीडा याला उधाण येते. सर्वसामान्यांना स्वभावधर्म ओळखून मनात दाबून ठेवलेल्या शृंगारवृत्तीला मुक्तपणे शब्दातून व्यक्त करण्याचा जणू धार्मिक परवानाच शिमग्याच्या निमित्ताने या कालावधीत लोकांना मिळतो. विनोदी कार्यक्रमांद्वारा विडंबनात्मक अश्लील बोलण्यातून लोकांना हसविणारे 'भांड' हे याच काळात गावगाड्यात हिंडू लागतात. दरवेशी, कोल्हाटी, शकुनी, बहुरूपी, पिंगळे, पांगूळ, बाळसंतोष, सरवडा या साऱ्या लोकभूमिका गावगाड्यात येऊन आपल्या आगमनाने रंग भरतात. त्यांच्या वर्षाच्या फेराचा देकार त्यांना शेतकऱ्यांच्या खळ्यावर मिळे आणि मग तृप्त होऊन या लोकभूमिका आपल्या पारंपरिक लोककलांमधून लोकांना रिझवित असत. नाथमहाराजांनी गावात येणाऱ्या या भाडांचा संदर्भ दिला आहे.

'का भांडांचे तोंडी भंडपुराण ।
त्यावरी आला शिमग्याचा सण।
मग करिता वाग्विटंबन ।
आवरी कवण तयासी ।'

शिमग्याच्या पंधरवड्यात वाग्विटंबनेपासून समाजाच्या विकृतींवर मार्मिक शैलीने आघात करणाऱ्या भांडाच्या भंडपुराणाला उधाण येत असे. काळात गावगाड्यात बारा बलुतेदारांचा तमाशा होत असे. गावच्या उत्पन्नातून 'देकार' नावाची देणगी या खेळ–तमाशासाठी बाजूला काढून ठेवली जायची. गावकीच्या तमाशात तेली, न्हावी, महार, कुंभार, मुलाणी, सुतार, गुरव, परीट हे सारे भाग घ्यायचे. गावचा ब्राह्मणही कवने करून द्यायचा आणि बारा बलुतेदारांच्या चावडीवर तमाशातून लोकरंजनाचे एक थिएटर उभे राहायचे.भक्तिरसात रमलेला गावगाड्यातला भोळा भाव तमाशाच्या शृंगारातही तितकाच रंगायचा. खेळ, सण, उत्सवांच्या माध्यमातून जीवनाच्या विविध रंगांची उधळण करणारी मुक्त समाजव्यवस्था इतरत्र कोठे आढळणार?

– किशोर गांधी

# 'गुणे आयुर्वेद रुग्णालया'मध्ये २५ मार्चपर्यंत मोफत सर्व रोग निदान व चिकित्सा शिबिर



नगर – आयुर्वेद शास्त्र व उपचाराचे महान तपस्वी वैद्य पंचानन गंगाधरशास्त्री गुणे यांच्या पुण्यतिथी निमित्त नगरच्या गुणे आयुर्वेद रुग्णालयात २५ मार्च पर्यंत मोफत सर्व रोग निदान व अत्यल्प दरात औषधोपचार शिबिर आयोजित करण्यात आले आहे. याशिबिरात रुग्णांवर तपासणी व उपचार करण्यात येणार आहेत, अशी माहिती आयुर्वेद शास्त्र सेवा मंडळाचे अध्यक्ष ॲड.सचिन जगताप यांनी दिली.

सर्व रोग निदान व चिकित्सा शिबिरात आयुर्वेदातील तज्ज्ञ डॉक्टर विविध व्याधींवर शुद्ध आयुर्वेदीय उपचार करणार आहेत. यामध्ये मुळव्याध भगंदर उपचार व शस्त्रक्रिया, त्वचा रोग, वात व्याधी, बालरोग, स्त्रीरोग, पोटाचे विकार तसेच इतर सर्व जुनाट आजारांवर आयुर्वेदिक उपचार होणार आहेत. गरजू रुग्णांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, आवाहन गुणे आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दत्तात्रय लोडे यांनी केले आहे.

# तिथीप्रमाणे शिवजयंतीनिमित्त शहरात १ मार्चला चित्रकला स्पर्धा

### 'छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील प्रसंग' हा स्पर्धेचा विषय, विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे

नगर – तिथीनुसार शिवजयंतीचे औचित्य साधत शहरात १ मार्च रोजी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग या विषयावर आधारित ही स्पर्धा होणार असून, शालेय विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.



शिवसेना (एकनाथ शिंदे) विभाग प्रमुख तथा महानुभाव पुजारी महासभेचे संघटन मंत्री आर्कि. प्रणव अशोकराव भोसले यांच्या पुढाकारातून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाबद्दल जागरूकता निर्माण व्हावी, तसेच त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, हा या स्पर्धेमागील मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रम, शौर्य, दूरदृष्टी आणि स्वराज्याच्या संकल्पनेतून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी, या उद्देशाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. चित्रकलेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पनाशक्तीला वाव देत महाराजांच्या जीवनातील प्रसंग साकारावेत, असे आवाहन आर्कि. प्रणव भोसले यांनी केले आहे.

गट १: इयत्ता १ ली ते ४ थी वगट २: इयत्ता ५ वी ते ९ वी या दोन गटात ही स्पर्धा होणार आहे. दोन्ही गटांसाठी स्वतंत्रपणे विजेते निवडले जाणार असून प्रत्येक गटातील स्पर्धकांना समान संधी देण्यात येणार आहे. स्पर्धेतील पहिल्या तीन विजेत्यांसाठी अनुक्रम ₹१००० , ₹७०० व ₹५०० रुपये रोख आणि मानपत्र, मानचिन्ह तसेच चतुर्थ क्रमांकाला मानपत्र व आकर्षक भेट वस्तू बक्षीस देण्यात येणार आहे.

स्पर्धेनंतर लगेचच परीक्षकांच्या उपस्थितीत निकाल जाहीर करून बक्षीस वितरण समारंभ पार पडणार आहे. ही चित्रकला स्पर्धा १ मार्च रोजी सकाळी ९:३० वाजता नगरकल्याण रोडवरील फॅमिली विश्व मॉल, उद्धव ॲकेडमी समोर आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धेचे ठिकाण मध्यवर्ती असल्याने विद्यार्थ्यांनी वेळेआधी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. स्पर्धेसंदर्भातील अधिक माहितीसाठी ७४९८९१९५७४ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आयोजकांनी कळविले आहे.

# आनंदऋषीजी इन्स्टिट्यूट ऑफ पॅरामेडिकल फायर अॅण्ड इंडस्ट्रीयल सेफ्टी कोर्सचा १०० टक्के निकाल

नगर – महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई अंतर्गत घेण्यात आलेल्या हिवाळी परीक्षा २०२५–२६ मध्ये आनंदऋषीजी इन्स्टिट्यूट ऑफ पॅरामेडिकल फायर अँड इंडस्ट्रियल सेफ्टी, अहिल्यानगर या संस्थेने शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखत १०० टक्के निकालाची उज्वल कामगिरी नोंदविली आहे.

एडीएमएलटी या अभ्यासक्रमात कानवडे शिवानी व डोंगरे अनिकेत यांनी प्रथम क्रमांक पटकावला. बोरसे पूजा व महाजन गणेश यांनी द्वितीय क्रमांक मिळविला, तर तुपे प्रकाश यांनी तृतीय क्रमांक संपादन केला.

एडीआयएस या अभ्यासक्रमात अभिषेक कुमार सिंग व सलमान खान यांनी प्रथम क्रमांक मिळविला. नवाज शरीफ व दांदले श्रीकृष्ण यांनी द्वितीय क्रमांक, तर मोहम्मद सलीम व मोहम्मद वाशिम यांनी तृतीय क्रमांक मिळविला.



कानवडे शिवानी अभिजीत कुमार देशमुख हरिष

डिप्लोमा इन फायर इंजिनीअरिंग या अभ्यासक्रमात देशमुख हरिष यांनी प्रथम क्रमांक, चेंगेडीया अक्षय व पुनम यांनी द्वितीय क्रमांक, तर सोनवणे पंकज व कानगुडे सोमनाथ यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला.

या यशाबद्दल संस्थेचे संचालक प्रा. हिरालाल लुनावत, सचिव अमृता जैन, कोषाध्यक्ष मनोज लुणावत तसेच प्रा. सुंबे, प्रा. सुरकुटला, मनीषा बोरा, जयेश बोथरा व मयुरी तिवारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

दरम्यान, शैक्षणिक वर्ष २०२६–२७ साठी पीजी डीएमएलटी, एडीआयएस आणि डिप्लोमा इन फायर सर्व्हिस इंजिनिअरिंग या अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली असून उत्कृष्ट गुणवत्ता व सातत्यपूर्ण निकालाची परंपरा असलेल्या आनंदऋषीजी इन्स्टिट्यूटमध्ये प्रवेश घेण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी ७२७६८१३१९९, ९१४५१५५७५५, ९१४६७५५९५५, ९११२७५५९५५ या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन प्रा. हिरालाल लुनावत यांनी केले आहे.





विभागीय वन अधिकारी सामाजिक वनीकरण अहिल्यानगरतर्फे आयोजित 'मेरी लाईफ थीम प्रोजेक्ट' या जिल्हास्तरीय खुल्या स्पर्धेत सावेडी येथील श्री समर्थ विद्यामंदिर माध्यमिक विभाग प्रशालेस तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

# 'मेरी लाईफ थीम प्रोजेक्ट' जिल्हास्तरीय स्पर्धेत श्री समर्थ विद्या मंदिर, सावेडीचा तृतीय क्रमांक

नगर – विभागीय वन अधिकारी सामाजिक वनीकरण अहिल्यानगर तर्फे आयोजित 'मेरी लाईफ थीम प्रोजेक्ट' या जिल्हास्तरीय खुल्या स्पर्धेमध्ये सावेडी येथील श्री समर्थ विद्यामंदिर माध्यमिक विभाग या प्रशालेस तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. पर्यावरण जनजागृती आणि सामाजिक बांधिलकी या उद्दिष्टांवर आधारित या स्पर्धेत जिल्ह्यातील विविध शाळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला होता.

या स्पर्धेमध्ये इयत्ता आठवी मधील विद्यार्थी चि. स्वराज शिंदे, रुद्रप्रताप राशिनकर आणि कुमारी अंकिता राऊत यांनी प्रभावी सादरीकरण करून परीक्षकांची मने जिंकली. विद्यार्थ्यांनी 'मेरी लाईफ' या संकल्पनेशी सुसंगत पर्यावरणपूरक जीवनशैली, वृक्षसंवर्धन आणि सामाजिक जबाबदारी या विषयांवर सर्जनशील मांडणी केली.

स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव धर्मवीर सालविट्ठल, भारतीय वनसेवा तसेच सुरेश खामकर, अध्यक्ष हरियाली संस्था यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना ट्रॉफी व प्रशस्तीपत्रक देऊन सन्मानित करण्यात आले. उपस्थितांनी विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांचे कौतुक करत पर्यावरण संवर्धनासाठी तरुण पिढीने पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. या यशाबद्दल प्रशालेचे शालेय समितीचे चेअरमन ॲड. किशोर देशपांडे, मुख्याध्यापिका सौ. वसुधा जोशी आणि पर्यवेक्षक एल. एम. कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या या यशामागे प्रशालेतील सौ. मनीषा अंबाडे व सौ. प्रियांका बांगर यांचे मार्गदर्शन लाभले.

# अहिल्यानगरीत महिला उद्योजकतेला चालना देणार

### महापौर ज्योतीताई गाडे यांचे प्रतिपादन, प्रयास ग्रुपच्या कार्यक्रमात उद्योगवृद्धीचा संकल्प, स्पर्धा, सांस्कृतिक सादरीकरणांनी रंगला उत्साह



प्रयास ग्रुप व दादी–नानी ग्रुपच्या वतीने आयोजित महिलांच्या विशेष कार्यक्रमात महापौर ज्योतीताई गाडे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

नगर – आजच्या काळात महिला केवळ घरापुरत्या मर्यादित न राहता उद्योग–व्यवसाय, सामाजिक कार्य, प्रशासन अशा विविध क्षेत्रांत पुढे जात आहेत. स्वतःच्या कामाचा अभिमान बाळगून प्रत्येक क्षेत्रात सक्षमपणे उभ्या राहणाऱ्या महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रयास ग्रुपच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या ग्रुपमुळे विविध क्षेत्रातील महिला एकत्र येऊन एकमेकांशी जोडल्या गेल्या असून त्यांच्या उद्योग–व्यवसायाला चालना मिळत आहे. प्रयास ग्रुप व दादी–नानी ग्रुपच्या वतीने आयोजित महिलांच्या विशेष कार्यक्रमात महापौर ज्योतीताई गाडे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. यावेळी त्यांनी बोलताना महापालिकेच्या माध्यमातून उद्योग–व्यवसाय करणाऱ्या महिलांसाठी विशेष सहकार्य करण्याचा व विविध उपक्रम राबविण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला. महिला सक्षम झाल्या तर समाज सक्षम होतो. महिलांना उद्योगासाठी मार्गदर्शन, प्रशिक्षण व आवश्यक सुविधा देण्यासाठी पालिका सकारात्मक भूमिका घेईल, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास सुप्रिया धनंजय जाधव, नगरसेविका गीतांजली काळे, सविता जाजू, आशा भांड, डॉ. दिपाली भारदे, सुपर्णा देशमुख, ॲड. स्वाती जाधव, रेणुका शर्मा, प्रयास ग्रुपच्या अध्यक्षा रजनी भंडारी, प्रयास दादी–नानी ग्रुपच्या अध्यक्षा जयाताई गायकवाड, संस्थापक अध्यक्षा अलकाताई मुंदडा, खजिनदार मेघना मुनोत, सचिव हिरा शहापुरे, छाया भंडारी, प्रीती पटवा, सविता धामट, पूर्वा एरंडे, हेमा पडोळे, संगीता घोडके आदींसह महिला उपस्थित होत्या.

यावेळी सुप्रिया धनंजय जाधव यांनी महिलांनी आत्मविश्वासाने पुढे येऊन स्वतःचे वेगळे स्थान निर्माण करावे, असे आवाहन केले. नगरसेविका गीतांजली काळे यांनी महिलांनी सर्व समाजाला सोबत घेत प्रगतीचा मार्ग स्वीकारला असून स्वार्थ आणि परमार्थ यांचा समतोल साधत जीवन जगण्याचा आदर्श त्यांनी समाजासमोर ठेवला आहे, असे मत व्यक्त केले.

प्रास्ताविकात रजनी भंडारी यांनी प्रयास ग्रुपच्या माध्यमातून महिलांच्या सर्वांगिण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. उद्योग मार्गदर्शन, कौशल्यविकास कार्यशाळा, सामाजिक बांधिलकी जपणारे उपक्रम यांमुळे महिलांना आत्मनिर्भर होण्याची संधी मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमात महिलांच्या वतीने नवनिर्वाचित महापौर व नगरसेविकांचा सत्कार करण्यात आला. तसेच महिलांसाठी विविध मनोरंजनात्मक व बौद्धिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली. सोडत पद्धतीने भाग्यवान महिलांनाही आकर्षक भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले.

सांस्कृतिक कार्यक्रमाने वातावरण अधिक रंगतदार झाले. शोभा ढेरे यांनी स्वरचित उखाणा सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. दिशा घोडके यांनी छत्रपती शिवाजी महाराजांवर प्रभावी पोवाडा सादर केला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी दीपा सोनी, दीपा मालू व सरला जाकोटिया यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गौरी जोशी यांनी केले. मेघना मुनोत यांनी आभार मानले.

# अंधश्रद्धा निर्मूलन समिती अहिल्यानगर शहर शाखा पदाधिकारी निवड जाहीर

### भारतभूषण भागवत अध्यक्ष, विनायक ताकपेरे कार्याध्यक्ष तर डॉ.पद्मजा गरुड व भाऊसाहेब सुडके उपाध्यक्ष

नगर – महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची अहिल्यानगर शहर शाखा पदाधिकारी निवड जाहिर करण्यात आल्याची माहिती जिल्हा प्रधान सचिव विनायक सापा यांनी दिली. अहिल्यानगर शहर शाखेची मासिक बैठक अंनिसचे जिल्हा प्रधान सचिव विनायक सापा यांच्या उपस्थितीत गरुड हॉस्पिटल, सावेडी येथे झाली. बैठकीत नगर शहर कार्यकारणीची निवड करण्यात आली.

शहर शाखेचे नवीन पदाधिकारी असे... भारतभूषण भागवत(अध्यक्ष), डॉ. पद्मजा गरुड व भाऊसाहेब सुडके (उपाध्यक्ष), विनायक ताकपेरे (कार्याध्यक्ष), सतीश केदार व ठकाजी जगधने (प्रधान सचिव), अनिता सापा (बुवाबाजी विरुद्ध संघर्ष विभाग कार्यवाह), अमोल भांडेकर (विविध उपक्रम विभाग कार्यवाह), नीता भागवत (वैज्ञानिक जाणीव विभाग कार्यवाह), मेघा झावरे व अरुणा लगड (महिला सहभाग कार्यवाह), महेंद्र आखाडे (युवा सहभाग कार्यवाह), ललित भारुळे (विवेक जागर विभाग कार्यवाह), भावना भारुळे (विज्ञान बोधवाहिनी विभाग कार्यवाह), गौरी गुरव(संविधान जागर विभाग कार्यवाह), रवींद्र सातपुते (विवेक वाहिनी विभाग कार्यवाह), शहर शाखेच्या नवीन पदाधिकाऱ्यांचे जिल्हा अध्यक्ष बाबासाहेब बुधवंत, उपाध्यक्ष डॉ.प्रकाश गरुड, प्रमोद भारुळे, जिल्हा कार्याध्यक्ष विष्णू गायकवाड, जिल्हा प्रधान सचिव विनायक सापा, देवदत्त साळवे, कायदेशीर सल्लागार अड.अभय राजे, प्रसिद्धी व सोशल मीडिया विभाग जिल्हा कार्यवाह सुखदेव फुलारी, बुवाबाजी संघर्ष विभाग जिल्हा कार्यवाह शशिकांत गायकवाड, जात पंचायत मुठमाती अभियान विभाग जिल्हा कार्यवाह कारभारी गायकवाड, संविधान जागर विभाग जिल्हा कार्यवाह दीपक शिरसाठ, विविध उपक्रम विभाग जिल्हा कार्यवाह बी.के.चव्हाण, निधी संकलन विभाग जिल्हा कार्यवाह प्राचार्य अशोक गवांदे, महिला सहभाग विभाग जिल्हा कार्यवाह श्रीमती छाया बंगाळ यांनी अभिनंदन केले.



अहिल्यानगर शहर शाखेची मासिक बैठक अंनिसचे जिल्हा प्रधान सचिव विनायक सापा यांच्या उपस्थितीत झाली. या बैठकीत नगर शहर कार्यकारणीची निवड करण्यात आली.










# अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाच्या परीक्षेत 'नृत्यझंकार'चे यश

## कथक नृत्यात २७ विद्यार्थिनींनी विशेष प्रावीण्य मिळवत अहिल्यानगर केंद्रात मानाचे स्थान पटकावले



अहमदनगर केंद्रात स्थान पटकावलेल्या तसेच विशेष प्राविण्य मिळवलेल्या नृत्यझंकारच्या विद्यार्थी व समवेत मार्गदर्शिका प्रिया ओगले-जोशी.

नगर - अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय यांच्या मार्फत घेण्यात आलेल्या कथक नृत्याच्या परीक्षांमध्ये अहिल्यानगर येथील 'नृत्यझंकार' नृत्यवर्गाने यश संपादन केले आहे. या परीक्षेत सहभागी झालेल्या सर्वच विद्यार्थिनींनी प्रथम श्रेणी प्राप्त करत गुणवत्तेची परंपरा कायम राखली. विशेष म्हणजे २७ विद्यार्थिनींनी विशेष योग्यता मिळवत सर्वच परीक्षांमध्ये अहिल्यानगर केंद्रात मानाचे स्थान पटकावले आहे.

प्रारंभिक प्रथम वर्ष परीक्षेत कु. स्वरा जोशी, भार्गवी पुंड आणि साईशा बेल्हेकर यांनी संयुक्तपणे प्रथम क्रमांक मिळवला. विश्वजा आमले व वीरा धिरडे यांनी द्वितीय क्रमांक, तर वृषाली पाटील व सई बिडवई यांनी तृतीय क्रमांक पटकावला.

प्रवेशिका (प्रथम-द्वितीय वर्ष) परीक्षेत वैष्णवी खराडे व अनुश्री भागवत यांनी प्रथम क्रमांक मिळवला. सुखदा कांबळे हिने द्वितीय क्रमांक, तर पर्णवी तागड हिने तृतीय क्रमांक मिळवून यशाची नोंद केली.

प्रवेशिका पूर्ण (तृतीय वर्ष) परीक्षेत सांस्कृतिक कारले हिने प्रथम क्रमांक मिळवला. गरिमा भालसिंग व स्वामिनी शिंदे यांनी द्वितीय क्रमांक, तर मैथिली वैद्य व गौरी माने यांनी तृतीय क्रमांक मिळवून नृत्यकौशल्य सिद्ध केले.

मध्यमा (प्रथम-चौथे वर्ष) परीक्षेत साक्षी बारहाते हिने प्रथम क्रमांक, हर्षा अत्रे हिने द्वितीय क्रमांक, तर सई बिडवे हिने तृतीय क्रमांक मिळवला.

विशारद (प्रथम) परीक्षेत अनुष्का बेदरे हिने प्रथम क्रमांक पटकावून 'नृत्यझंकार'च्या यशात भर घातली.

सर्व विद्यार्थिनींना नृत्यझंकारच्या संचालिका प्रिया ओगले-जोशी यांचे मार्गदर्शन, कठोर सराव व शास्त्रीय शिस्त लाभली. त्यांच्या मार्गदर्शनामुळेच विद्यार्थिनींनी कथक नृत्यातील तंत्र, तालबद्धता आणि अभिव्यक्ती प्रभावीपणे सादर करत उत्कृष्ट निकाल मिळवला, असे पालक व रसिकांनी गौरवोद्गार काढले.

# 'गुरु तेग बहादूर साहेबजी यांच्या शहिदी समागम शताब्दी'निमित्त राधाबाई काळे महिला महाविद्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन



नगर - राधाबाई काळे महिला महाविद्यालय, अहिल्यानगर विद्यार्थी विकास मंडळ, सांस्कृतिक विभाग व इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने २६ फेब्रुवारी रोजी श्री गुरु तेग बहादूर साहेब जी यांच्या ३५० व्या शहिदी समागम शताब्दी निमित्त महाविद्यालायचे प्राचार्य डॉ.शंकर थोपटे यांच्या मार्गदर्शनाखाली व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी उपस्थित असलेले प्रमुख पाहुणे प्रा. गगनदीप सिंग यांनी गुरु तेग बहादूर जी यांच्या जीवनाचा परिचय करून दिला. त्यांनी आपल्या मनोगतात गुरु तेग बहादूरजी यांनी मानवाधिकारांच्या रक्षणासाठी दिलेल्या अतुलनीय योगदाना संबंधीचे विचार मांडले.

डॉ. शुभांगी ठुबे यांनी अध्यक्षीय मनोगतातून गुरु तेग बहादूर जी यांनी कशाप्रकारे लोकांना सत्य, संयम, करूणा आणि धैर्य या मुल्यांचा संदेश दिल्याचे विवेचन केले.

डॉ.गणेश विधाटे यांनी प्रास्तविकेत गुरु तेग बहादूर जी यांचे बलिदान धार्मिक स्वातंत्र्याचे प्रतीक कसे बनले होते. या संबंधी माहिती दिली. गुरु तेग बहादूर साहेब जी यांच्या ३५० व्या शहिदी समागम शताब्दी निमित्त निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा आणि प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली. यावेळी महाविद्यालयाच्या वतीने गुरुद्वारा भेटीचे आयोजन करण्यात आले. प्रा. महेश जाधव यांनी आभार मानले. या वेळी मराठी विभाग प्रमुख डॉ. कोतकर सचिन, प्रा.अमोल बुचुडे, प्रा.शुभम पाठक, प्रा.स्नेहा पाटील, प्रा.क्रांती बारस्कर व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

# धनादेश न वटल्याप्रकरणी आरोपीस ५० हजाराचा दंड व कारावासाची शिक्षा

नगर - लक्ष्मी महिला नागरी सहकारी पतसंस्था यांच्याकडुन आरोपी मंदाकिनी सुर्यकांत गोफणे यांनी कर्ज घेतले होते. सदरच्या कर्जाच्या थकबाकीपोटी आरोपीने फिर्यादी पतसंस्थेस दिलेला चेक न वटता परत आल्याने फिर्यादीने आरोपी विरुध्द निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टचे कलम १३८ अन्वये फिर्याद दाखल केली. या फिर्यादीच्या गुणदोषावर चौकशी होवून आरोपीस धनादेश न वटल्या प्रकरणी चिफ ज्युडिशिअल मॅजिस्ट्रेट कोर्ट नं. ६ प्र. तु. शेजवळ - काळे यांनी उपलब्ध पुराव्याचा गुणदोषावर विचार करुन आरोपीस दोषी ठरविले व आरोपीस रु.५०,००० दंडाची शिक्षा व सदर रक्कम न भरल्यास एक महिना साध्या कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली व दंडाची रक्कम फिर्यादीस नुकसान भरपाई देण्याचा हुकुम करण्यात आला.

या प्रकरणात फिर्यादी पतसंस्थेच्यावतीने ॲड.वंदना दहिफळे व ॲड. प्रतिक्षा मंगलारम, ॲड. आप्पासाहेब म्हस्के, ॲड. आर. बी. गाली व संस्थेच्या वतीने सुहास त्रिंबक मोहोरकर यांनी कामकाज केले.

# अहमदनगर महाविद्यालयात संशोधक विद्यार्थ्यांसाठी 'उत्कृष्ट संशोधनाचे मार्ग' कार्यशाळा



अहमदनगर महाविद्यालय येथील संशोधन केंद्र आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यालयातील संशोधक विद्यार्थ्यांसाठी आयोजित कार्यशाळेत न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स महाविद्यालयचे प्रभारी प्राचार्य बाळासाहेब सागडे यांना प्रमुख वक्ते म्हणून निमंत्रित करण्यात आले होते.

नगर - अहमदनगर महाविद्यालय येथील संशोधन केंद्र आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यालयातील संशोधक विद्यार्थ्यांसाठी 'उत्कृष्ट संशोधनासाठीचे मार्ग' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा पार पडली. संशोधनाच्या मूलभूत संकल्पनांपासून ते दर्जेदार सादरीकरणापर्यंतच्या विविध पैलूंवर या कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यशाळेसाठी न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स महाविद्यालयचे प्रभारी प्राचार्य बाळासाहेब सागडे यांना प्रमुख वक्ते म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. आपल्या व्याख्यानात त्यांनी संशोधन म्हणजे केवळ माहिती संकलन नव्हे, तर समस्येची शास्त्रीय उकल करण्याची सुसंगत प्रक्रिया आहे. संशोधनासाठी उद्दिष्टांची स्पष्टता, योग्य पद्धतींची निवड, विश्वसनीय संदर्भांचा वापर आणि नैतिकता या घटकांचे पालन अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन केले. संशोधन प्रस्ताव लेखन, माहिती विश्लेषण आणि निष्कर्ष मांडणी या टप्प्यांवर त्यांनी उपयुक्त सूचना दिल्या.

कार्यक्रमात अहमदनगर महाविद्यालयातील मराठी विभागाचे विभागप्रमुख डॉ. सुधाकर शेलार यांनी संशोधन लेखनातील भाषा, शैली आणि आशयाची शुद्धता यावर मार्गदर्शन केले. संशोधन लेखनात भाषेची नेमकेपणा आणि संदर्भांची अचूक मांडणी संशोधनाच्या विश्वासार्हतेला बळकटी देते, असे त्यांनी सांगितले.

तसेच जैवतंत्रज्ञान विभागातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. सनी रुपवते यांनी आधुनिक संशोधन पद्धती, प्रयोगात्मक रचना आणि तंत्रज्ञानाधारित साधनांचा वापर यावर प्रकाश टाकला. आजच्या काळात बहुविषयक संशोधन आणि डेटा-आधारित विश्लेषण हे उत्कृष्ट संशोधनाचे महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत, असे ते म्हणाले.

कार्यक्रमाला अहमदनगर महाविद्यालयाचे उपप्राचार्य दिलीपकुमार भालसिंग प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी संशोधनाकडे करिअरच्या दृष्टीने पाहत सातत्य, जिज्ञासा आणि प्रामाणिकपणा जपावा, असे त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात नमूद केले. या कार्यशाळेत महाविद्यालयातील विविध विषयांचे एकूण ७५ संशोधक विद्यार्थी सहभागी झाले होते. कार्यशाळेचे समन्वयक डॉ. अभिजीत कुलकर्णी यांनी ही माहिती देत, अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या संशोधन क्षमतेला दिशा मिळते, असे सांगितले.

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक **विनायक दिलीप दुसाने** रा. श्रीकृष्ण नगर,केडगाव अहमदनगर. यांचे मालकी वहिवाटीचे आहे. सदर मिळकतीचे रजिस्टर साठेखत करुन आमचे अशिलांबरोबर कायमखुष खरेदी देण्यांचे ठरवुन आमच्या अशिलाकडुन रक्कम स्विकारलेली आहे. तसेच सदरची मिळकत निर्वेध, निजोखमी असल्या बाबत आमचे अशिलास विश्वास व भरोसा दिलेला आहे.

परंतु कोणाचीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की सदर मिळकतीबाबत कोणतेही चालू वाद असल्यास अथवा साठेखत, खरेदीखत,गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षिसपत्र मनाईहुकुम, दावा कोर्ट कारवाई बँक बोजा सोसायटी राईटस अन्य वस्त्र लिज अथवा अगर कोणताही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास संबंधीताने ही नोटीस प्रसिध्द झाले पासून **८ दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपूर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर प्लॉटस् खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट : मिळकतीचे वर्णन -**

डि.।। अहिल्यानगर/अहमदनगर सब. डि.।। ता. नगर पैकी अहिल्यानगर/अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मौजे **केडगांव** येथील प्लॉट व त्यावरील बांधकामासह मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

| स.नं. | प्लॉट नं. | चौ.मीटर |
|---|---|---|
| ५०३/१अ | ५१ | १०९.२५ |

हा संपुर्ण प्लॉट व त्यावरील आर.सी.सी.पध्दतीचे बांधकाम झालेले असून खरेदीखताप्रमाणे तळमजल्यावरील बांधकाम व पहिल्या मजल्यावरील बांधकाम असे एकुण क्षेत्र ९०९.०० चौ.फुट. (जाग्यावरील परिस्थिती प्रमाणे बांधकाम क्षेत्र ६९१.०० चौ. फूट) यातील इलेक्ट्रीक लाईट मीटर व पाण्याचे नळ कनेक्शनसह संपुर्ण मिळकतीबाबत.

**ॲड.नाजीम अहमद इस्माईल शेख**
**ॲड. कुरेशी फैजान फारुक**
जुन्या कलेक्टर ऑफिसशेजारी,डावरेगल्ली,
अहमदनगर, मो : ९८८१४३१८६०, ७२७६२५२४७८

दि.२६/०२/२०२६
अहिल्यानगर/अहमदनगर.

# पद्मशाली समाजाचा स्तर वाढविण्यासाठी प्रयत्न करणार

## डॉ. सूर्यप्रकाश कोठे यांचे प्रतिपादन



डॉ. सूर्यप्रकाश कोठे अहिल्यानगर येथे भेटीसाठी आले असता अहिल्यानगर पद्मशाली पंचकमिटीच्यावतीने सत्कार करतान अध्यक्ष श्रीनिवास बोज्जा व दत्तात्रय रासकोंडा आदी.

नगर - अहिल्यानगर येथे पद्मशाली समाज मोठा आहे, अनेक क्षेत्रात विखूरलेला आहे, समाजाची एकी नसल्यामुळे समाजाचा सर्वांगीण विकास खुंटलेला आहे यासाठी माझ्या पदाचा उपयोग अहिल्यानगर येथील पद्मशाली समाजाचा स्तर वाढविण्याचा प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन अखिल भारतीय पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली समाजाचे अध्यक्ष डॉ. सूर्यप्रकाश कोठे यांनी केले.

डॉ. सूर्यप्रकाश कोठे यांची निवड झाल्याने सोलापूरहुन अहिल्यानगर येथे भेटीसाठी आले असता अहिल्यानगर पद्मशाली पंचकमिटी समाजाच्या वतीने अध्यक्ष श्रीनिवास बोज्जा व पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली समाजाचे उपाध्यक्ष दत्तात्रय रासकोंडा यांनी त्यांचा सन्मान केला. या वेळी त्यांच्या सोबत पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष शशिकांत कैची, खजिनदार श्रीनिवास चिलका, उद्योजक यलाप्पा गड्डम, नरसिंग कोडम, संगमनेर येथील मा. नगरसेवक सिद्राम दिड्डी व दत्तात्रय रासकोंडा येथील पंचकमिटीचे पुरषोत्तम बुरा, ॲड. राजू गाली, विनोद बोगा, गणेश चेन्नुर, पुरषोत्तम सब्बन, श्रीनिवास रासकोंडा, प्रविण दिड्डी आदी उपस्थित होते.

यावेळी सत्कारास उत्तर देताना डॉ. कोठे म्हणाले अहिल्यानगर येथे पद्मशाली समाज मोठा आहे अनेक क्षेत्रात विखूरलेला आहे, समाजाची एकी नसल्यामुळे समाजाचा सर्वांगीण विकास खुंटलेला आहे, यासाठी माझ्या पदाचा उपयोग अहिल्यानगर येथील पद्मशाली समाजाचा स्तर वाढविण्याचा प्रयत्न करणार असे डॉ. कोठे म्हणाले.

यावेळी शशिकांत कैची म्हणाले आम्ही सोलापूरहुन अहिल्यानगर येथे सोलापूर पद्मशाली समाजाची माहिती देण्यासाठी आलो असून सोलापूर येथे पद्मशाली समाजाची एकी असल्यामुळेच समाजाचा आमदार, महापौर व १८ नगरसेवक निवडून आलेले आहेत या प्रमाणेच नगर येथेही एकी होणे गरजेचे असून आम्ही डॉ. कोठे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक पंचकमिटी पद्मशाली समाजाचे अध्यक्ष श्रीनिवास बोज्जा यांनी करताना म्हणाले की, नगर येथे समाजाची एकी नसल्यामुळेच समाजाला सर्वच स्तरातून नुकसान होत आहे. परंतु आम्ही कमिटीमध्ये सदस्य पदाधिकारी हे सर्व तरुण, उद्योजक, वकील व डॉक्टर असे घेतले असल्यामुळे भविष्यात नक्कीच याचा फायदा समाजाला होईल असे सांगितले.

सुरुवातीला पाहुण्यांचे स्वागत श्रीनिवास रासकोंडा यांनी केले. ॲड.राजू गाली यांनी आभार मानले.




# जेईई मेन २०२६ मध्ये टॉपर्स अकॅडमीचे यश

नगर - नॅशनल टेस्टिंग एजन्सीमार्फत घेण्यात आलेल्या जेईई मेन २०२६ पहिल्या सेशन साठीच्या परीक्षेत श्रीगोंदा, काष्टी येथील टॉपर्स अकॅडेमीच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. या अकॅडमी मधील २२ पैकी २१ विद्यार्थ्यांनी ९४ पेक्षा जास्त पर्सेंटाइल मिळवले आहेत.

निकालामध्ये शिवम शितोळे (९८.९९), आर्या शेळके (९८.९३), मयूर यादव (९८.९२) यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे. तसेच द्रोन लगड, अनुराधा हराळ, भूमि काळे विद्यार्थ्यांनीही ९८ पेक्षा अधिक पर्सेंटाइल तर अभिषेक काशिद, शुभम कळमकर, दीप लगड विद्यार्थ्यांनीही ९७ पेक्षा अधिक पर्सेंटाइल व पायल कुरुमकर, सार्थक टकले, भक्ती जाधव, यशराज गरुड, रोहित गव्हाणे, सिद्धेश थोरात, गौरव शेळके, अनुष्का थोरात, राधा रोडे, ओंकार वेताळ, हर्षराज चौधरी, शुभम काळे या विद्यार्थ्यांनीही ९४ पेक्षा अधिक पर्सेंटाइल मिळवत यश मिळवले.

२२ पैकी एकूण २१ विद्यार्थ्यांनी ९४ पेक्षा जास्त पर्सेंटाइल मिळविले. संस्थेचे संचालक प्रा. गणेश कळसकर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



नेप्ती येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयाने राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये अव्वल स्थान पटकावत विजय मिळवला.

# राज्यस्तरीय बास्केटबॉल स्पर्धेत अभूतपूर्व विजय मिळवत नेप्तीच्या श्री छत्रपती तंत्रनिकेतनने अव्वल स्थान पटकावले

नगर - आंतर पदविका अभियांत्रिकी विद्यार्थी क्रीडा संघटना (IEDSSA) आणि संजीवनी के.बी.पी. तंत्रनिकेतन महाविद्यालय कोपरगाव जिल्हा अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या दोन दिवसीय २४ व २५ फेब्रुवारी रोजी आयोजित आंतर पदविका राज्यस्तरीय बास्केटबॉल व व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धा : २०२५-२६ मध्ये नेप्ती येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयाने राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये अव्वल स्थान पटकावत विजय मिळवला आहे. राज्यातील विविध संघ मुंबई, पुणे, वाशी, चोपडा, नाशिक, सोलापूर, नांदेड, पुणे, पिंप्री-चिंचवड पुणे, सातारा, कोल्हापूर, अहिल्यानगर, अशा विविध त्यांच्या जिल्ह्यातील जिल्हास्तर विजयी संघाने राज्यस्तरावर विविध जिल्ह्याचे प्रतिनिधित्व केले, यात अहिल्यानगर जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व श्री छत्रपती शिवाजी महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय नेप्ती, अहिल्यानगर (तंत्रनिकेतन) च्या खेळाडूंनी केले. (स्कोअर २५-१३) १२ गुणाच्या फरकाने सेमी फायनल आणि (स्कोअर- ३२-१२) २० गुणाच्या फरकाने फायनल मॅच विजयी घोषित झाली.

बास्केटबॉल सहभागी खेळाडू संघ : यश म्हस्के (संघ नायक), ओंकार दाभाडे, प्रज्वल बारगळ, जय रेपाटे, अनुज होटकर, कृष्णा मानकर, सिद्धांत तनपुरे, यश सोनवणे, समरजीतसिंह गंभीर, ओंकार जाधव, आदित्य फंड, संग्राम काकडे, प्रथमेश काशिद (योगदान) या सर्वांच्या उत्कृष्ट खेळाडू वृत्तीचे दर्शन याप्रसंगी झाले. खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक प्रा.अविनाश हंडाळ यांचे मार्गदर्शन लाभले.

याबद्दल प्राचार्य डॉ. वाय आर खर्डे यांनी खेळाडूंचा सन्मान केला. विजयी संघास विभागप्रमुख: प्रा.पी.जी. निकम, प्रा.एस.पी. विधाते, प्रा.ए.बी. काळे, डॉ.एम.के. भोसले, डॉ.एस.एम. वाळके, डॉ.व्ही. व्ही. पाटील, प्रा.बी.एन. खरड, प्रा.पी.आर. मुटकुळे यांच्यासमवेत प्रा.कांबळे, प्रा.निर्मळ, प्रा.वाणी, प्रा.धंगेकर तसेच शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी यांनी देखील अभिनंदन केले.

आंतर पदविका अभियांत्रिकी विद्यार्थी क्रीडा संघटना - २९ नोव्हेंबर १९६६ रोजी स्थापना झाली, तेव्हा पासून आज रोजी पर्यंत अहिल्यानगर (ए१ झोन) बास्केटबॉल संघ, अहिल्यानगर ला बास्केटबॉल या खेळात आतापर्यंत राज्यस्तरावर एकदाही विजय मिळवता आलेला नाही. मात्र आज रोजी आमच्या महाविद्यालयाचे खेळाडूंनी विजय हा इतिहास सुवर्णक्षण, सुवर्ण अक्षरांत लिहिला, याबद्दल अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज या संस्थेचे अध्यक्ष. रा.ह.दरे, उपाध्यक्ष डॉक्टर विवेक भापकर, सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील, सहसचिव मुकेश मुळे, खजिनदार ॲड. दीपलक्ष्मी म्हसे तसेच संस्था सदस्य-पदाधिकारी यांनी देखील सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमूद केलेली बिनशेती प्लॉट मिळकत विद्यमान मालक यांच्या स्वकष्टार्जित खरेदी मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची आहे. नमूद मिळकतीच्या मा.महसुल प्रशासनाकडील ७/१२ दप्तरी आणि आज रोजीच्या संगणकीय ७/१२ दप्तरी विद्यमान मालक यांच्या नावाची नोंद झालेली आहे. नमूद मिळकतीची विक्री करण्याची बोली विद्यमान मालक यांनी आमच्या अशिलाबरोबर केलेली आहे. त्याद्वारे नमूद मिळकत कायमखूष खरेदी कामी आमच्या अशिलास प्रस्ताव दिलेला आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की,नमूद मिळकतीबाबत कोणतेही चालू वाद असल्यास अथवा साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षिसपत्र मनाईहुकूम, दावा कोर्ट, कारवाई बॅक बोजा सोसायटी राईटस अन्न वस्त्र लिज अथवा अगर कोणताही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास संबंधीताने ही नोटीस प्रसिध्द झाले पासून ७ **दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर **संपूर्ण प्रशासकीय व न्यायिक कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे.** यथायोग्य कागदोपत्री पुराव्याशिवाय आलेल्या व कोणत्याही पुराव्याशिवाय प्रस्तुत जाहीर नोटीसीस केवळ वर्तमान पत्रातून घेतलेल्या कोणत्याही हरकती ग्राह्य धरता येणार नाही. **विहित ७ दिवस मुदतीत कोणाचीही कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत न आल्यास आमचे अशिल विद्यमान मालक यांच्या मालकी हक्काच्या मिळकत क्षेत्राचे कायदेशीर रजिस्टर दस्तांव्दये हस्तांतरण दस्त करून घेतील.** तद्नंतर कोणाचेही कोणत्याही प्रकारे तक्रार अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडून दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट : १) मिळकतीचे वर्णनः**-जिल्हा अहिल्यानगर पोट तुकडी ता. नगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील मौजे **केडगांव** येथील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

| सर्व्हे नंबर | प्लॉट नंबर | क्षेत्रफळ चौ.मी. |
|---|---|---|
| ६२/१ | ७१ | ३००.०० (संगणकीय ७/१२ उताऱ्याप्रमाणे ३.००.०० आर.चौ.मी.) |
| ही संपूर्ण बिनशेती प्लॉट मिळकत. | | |

यांसी चतु:सिमा

| पूर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
|---|---|---|---|
| ९ मीटर रुंदीचा रस्ता | प्लॉट नं.७२ | प्लॉट नं.७९ | प्लॉट नं.६९ व ७० |

(टीप :- वर कलम १ मधील मिळकतीच्या चतु:सीमा लिहून देणार यांनी दिलेल्या माहितीवरुन व लेआऊट मधील प्रत्यक्ष वहिवाटीप्रमाणे नमूद केलेल्या आहेत. परंतु नमूद चतु:सिमामध्ये काही चूक/चुका आढळून आल्यास मुलकी दप्तरी, महसुल व तत्सम शासकीय रेकॉर्डप्रमाणे किंवा मंजुर लेआऊट प्रमाणे प्रत्यक्ष परिस्थिती अंती ज्या चतु:सीमा असतील त्याच अंतिम चतु:सीमा मानावयाच्या आहेत.)

येणेप्रमाणे चतु:सिमापूर्वक काही एक राखून न ठेविता.

**मिळकतीचे विद्यमान मालक-डॉ.नरेंद्र झणकारमल फिरोदिया**
रा.१४, इंद्रप्रस्त कार्यालयामागे, भवानीनगर, मार्केटयार्ड,अहिल्यानगर
अहिल्यानगर,
दि. २६/०२/२०२६

**ॲड.संदिप दादासाहेब पाखरे** (बी.ए.एलएल.बी.)
नोटरी पब्लिक, भारत सरकार
**ॲड.सौ.श्रृती संदिप पाखरे** (बी.ए.एलएल.एम.)
६२७०, लॉयर्स ऑफिस, लक्ष्मी दिप निवास, बालिकाश्रम जवळ,अहमदनगर
मो : ९८५०१८१७१७, Email-pakhare.s3229@gmail.com

# विविध मागण्यांसाठी भूमी अभिलेख कर्मचाऱ्यांचे राज्यस्तरीय आंदोलन सुरु; तर २ मार्चपासून 'बेमुदत कामबंद आंदोलन' करण्याचा कृती समितीचा इशारा

पुणे – महाराष्ट्रातील भुमि अभिलेख विभागातील कर्मचा–यांचे प्रलंबित मागण्यांबाबत विभागातील संघटनांकडून आजपर्यंत सनदशीर मार्गाने लढा उभारण्यात आला आहे. तांत्रिक संघटनेचे पाठपुराव्यामुळे महाराष्ट्र प्रशासकिय न्यायाधीकरण मुंबई खंडपीठ नागपूर यांचे आदेशान्वये अदयापही तात्रीक वेतनश्रेणी लागू करण्यात आली नाही तसेच महसूल मंत्री यांचे अध्यक्षतेखाली संघटना प्रतिनिधी यांच्यासोबत मंत्रालय मुंबई येथे नुकत्याच झालेल्या बैठकित दिडशे दिवसाच्या कृती कार्यक्रमात भुमि अभिलेख विभागातील कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य करण्याबाबत आश्वासित करण्यात आले होते मात्र दिडशे दिवसाचा कालावधी संपून तीन महीने झाले असूनही मागण्या मान्य झाल्या नाहीत. विभाग व शासन स्तरावरून याबाबत केवळ वेळकाढू करून कर्मचाऱ्यांचे संविधानिक न्याय हक्कावर गदा आणण्याचे व दबावत्राचा वापर करून काम सुरू आहे त्यामुळे न्याय मिळत नसल्याने व्यथित होवून नाईनाजास्तव राज्यभरातील समस्त कर्मचाऱ्यांनी भूमि अभिलेख कर्मचारी कती समिति महाराष्ट राज्याचे वतीने १८ फेब्रुवारीपासून संपुर्ण महाराष्ट्रात टप्याटप्याने आंदोलन सुरु आहे. त्या अनुषंगाने २७ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता भूमी अभिलेख कृती समिती महाराष्ट्र राज्याच्यावतीने जमाबंदी आयुक्त कार्यालय भूमी अभिलेख पुणे कार्यलयावर हजारो कर्मचारी यांचा मोर्चा धडकणार आहे.

मोर्चाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, ससून हॉस्पिटल जवळ, पुणे येथून होणार आहे. भुमि अभिलेख विभागाच्या इतिहासात पहील्यांदाच सर्व कर्मचारी यांनी कृती समितीच्या माध्यमातून एक होवून आंदोलनाचे रणशिंग फुकले आहे.



या आंदोनालमध्ये भुमि अभिलेख विभागातील कर्मचाऱ्यांचे शासन स्तरावरील प्रलंबित मागण्या खालील प्रमाणे आहेत, भुमि अभिलेख कर्मचाऱ्यांना तांत्रिक वेतनश्रेणी लागू करावी, विभागातील खाजगीकरणाचा निर्णय रद्द करणेबाबत, सुधारीत आकृतीबंध, मोजणी कर्मचाऱ्यांना निश्चित प्रवासभत्त ठरवून तो वेतनामध्ये समाविष्ट करण्याबाबत, शेत रस्ते मोजणी व हद्द कायमबाबत शासन निर्णयामध्ये सुधारणा करणे, मोजणी ही बाब धोरणात्मक बाब म्हणून अंतर्भुत करण्यात येवू नये, भूमि अभिलेख विभाग हा तांत्रिक विभाग असल्याने जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख महाराष्ट्र राज्य, पुणे हे पद भारतीय अभियांत्रीकी सेवेतून भरणे व इतर मागण्या तसेच भुमि अभिलेख विभागातील कर्मचाऱ्यांचे जमाबंदी आयुक्त स्तरावरील प्रलंबित मागण्या ई मोजणी व्हर्जन २ सॉफ्टवेअर हे व्हर्जन १ प्रमाणे सुटसुटीत व वापरास सोपे करणे, अधिकारी – कर्मचाऱ्यांवर नियुक्ती प्राधिकारी यांच्या परवानगी व चौकशीशिवाय थेट फौजदारी गुन्हे दाखल करण्याची चुकीची व अमानवी पध्दत बंद करणेबाबत, १८ मोजणी प्रकरणाबाबत १४ जानेवारी २०२६ चे अन्यायकारक परिपत्रक रद्द करावे, प्रत्येक कर्मचाऱ्याला पुरेसे व स्वतंत्र मोजणी साहित्य रोव्हर, लॅपटॉप, डाटा कार्ड इत्यादी पुरविण्याबाबत, शासकिय सुट्टीच्या दिवशी अपवाद वगळता कोणतेही कामकाज करण्यात येवू नये, अन्यायकारक प्रतिनियुक्ती बंद करावी, अतिरिक्त कामकाज केल्यास त्याचा मोबदला नियमानुसार देण्याबाबत, जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांचे स्तवरावरून नियमबाहय पध्दतीने सुरू असलेल्या वेतन वसुली आदेश थांबविण्याबाबत, तसेच वर्ग ४ कर्मचारी यांचे प्रश्न, या व इतर मागण्यांचा या राज्यव्यापी आंदोलनात समावेश आहे

भूमि अभिलेख कृती समितीच्यावतीने संपुर्ण महाराष्ट्रत हे आंदोलन टप्याटप्याने होणार आहे. १८ फेब्रुवारी रोजी भूमि अभिलेख कर्मचारी कार्यालयात मोजणी साहीत्य जमा करून काळया फिती लावून कामकाज करण्यात आले. २० फेब्रुवारीपासून मोजणी काम बंद ठेवून काळया फिती लावून फक्त कार्यालयीन कामकाज करत आहेत. २३ ते २६ फेब्रुवारी या काळात सामुहिक रजा आंदोलन केले, तसेच २७ फेब्रुवारी रोजी जमाबंदी आयुक्त पुणे कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढण्यात येवून धरणे आंदोलन करण्यात येईल. वरिल मागण्या मान्य न झाल्यास २ मार्चपासून संपुर्ण बेमुदत कामबंद आंदोलन करण्यात येईल. या आंदोलनामध्ये महाराष्ट्रातील भूमि अभिलख कर्मचाऱ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन भूमि अभिलेख कर्मचारी कृती समितीने केले आहे.

# अतिक्रमण काढून व रस्त्याच्या कामाची चौकशी करावी अन्यथा तीव्र आंदोलन करणार : अखंड मराठा समाज

नगर – बुलढाणा जिल्ह्यातील लोणार तालुक्यातील चिखला गावात २० फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ ते ७ वाजण्याच्या सुमारास घडलेली घटना संपूर्ण महाराष्ट्राच्या संस्कृतीला काळीमा फासणारी असल्याचा तीव्र निषेध अखंड मराठा समाजाच्या वतीने व्यक्त करण्यात आला. शिवस्मारक हटविण्याच्या उद्देशाने काही समाजकंटकांनी मराठा समाजातील बांधव व भगिनींवर दगडफेक व मारहाण केल्याची घटना अत्यंत संतापजनक असून या प्रकरणात संजीवनी वाघ यांच्यासह अनेक महिलांवर अमानुष अत्याचार झाल्याची माहिती समोर आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.



गावातील अतिक्रमण काढून व रस्त्याच्या कामाची चौकशी करण्याच्या मागणीचे निवेदन अखंड मराठा समाजाच्यावतीने अप्पर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे यांना देण्यात आले.

महिलांवर हात उचलणे हा केवळ कायद्याचा भंग नसून मानवतेवर घाव असल्याचे सांगत, स्त्री सन्मान व न्यायाची शिकवण देणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांचा अवमान करणारी ही कृती असल्याचे अखंड मराठा समाजाने म्हटले आहे. या घटनेची निष्पक्ष व सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

याच निवेदनात जामखेड शहरातील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डी संदर्भातील प्रश्नांवरही लक्ष वेधण्यात आले. जामखेड या शहरातून जाणारा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डी हा वाहतूक व व्यापाराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असून परिसरातील तालुके व मराठवाडा विभागाशी संपर्क साधणारा प्रमुख मार्ग आहे. मात्र जामखेड–सौताडा या रस्त्याचे काम पूर्ण करण्यासाठी १८ महिन्यांचा कालावधी निश्चित असतानाही गेली तीन ते चार वर्षे हे काम प्रलंबित असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. महामार्गाच्या दोन्ही बाजूंना मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले असून, जाम खेड शहर वगळता इतर ठिकाणी प्रशासनाने अतिक्रमण हटविण्याची कारवाई केली असताना शहर हद्दीतील अतिक्रमणांबाबत प्रभावी पावले उचलली नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डी वरील जामखेड शहर हद्दीतील सर्व अतिक्रमणे नियमानुसार हटवावीत, तसेच रस्त्याच्या कामाची गुणवत्ता तपासण्यासाठी तांत्रिक चौकशी समिती नेमावी, अशी मागणी करण्यात आली आहे. मूळ डीपीआर नोंदी, प्रत्यक्ष स्थळ मोजणी व मंजूर आराखड्याची पडताळणी करण्यासाठी स्वतंत्र व सक्षम अधिकाऱ्यांची चौकशी समिती नेमून दोषी आढळणाऱ्या संबंधित अधिकारी व कंत्राटदारांवर कायदेशीर कारवाई करावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

तसेच महावितरणचे विद्युत खांब न हलवता रस्त्याचे काम करण्यात आल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होत असून नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी व वाहतूक कोंडीची समस्या तात्काळ मार्गी लावावी, अशी मागणी करण्यात आली.

अखंड मराठा समाजाच्या वतीने अप्पर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी गोरक्षनाथ दळवी, गोरक्षनाथ पठारे, संदीप जगताप, सिद्धांत पानसरे, रत्नकांत दरेकर, रवींद्र बारस्कर, भाग्येश सव्वाशे, योगेश कोरेकर, अमित भुतकर, सागर भोसले, नितीन गव्हाणे, जगन्नाथ निमसे, सोमनाथ गुंड आदी पदाधिकारी उपस्थित होते.

प्रशासनाने या सर्व मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष देऊन तात्काळ कारवाई करावी, अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

# लोणी–प्रवरानगर येथे २८ फेब्रुवारीपासून 'अहिल्यानगर ग्रंथोत्सव २०२५' चे आयोजन

नगर – जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर व सिंधुताई एकनाथराव विखे पाटील सार्वजनिक वाचनालय, लोणी बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने 'अहिल्यानगर ग्रंथोत्सव २०२५' चे आयोजन मा. खासदार बाळासाहेब विखे पाटील बहुउद्देशीय सभागृह, पद्मश्री विखे पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, प्रवरानगर, ता. राहाता येथे २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा ग्रंथालय अधिकारी, अहिल्यानगर यांनी दिली आहे.

'अहिल्यानगर ग्रंथोत्सव २०२५' चा उद्घाटन समारंभ विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली व जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते २८ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता होणार आहे.

या कार्यक्रमास खासदार भाऊसाहेब वाकचौरे, खासदार निलेश लंके, आमदार किशोर दराडे, आमदार सत्यजीत तांबे, आमदार शिवाजीराव गर्जे, आमदार श्रीमती मोनिकाताई राजळे, आमदार संग्राम जगताप, आमदार डॉ. किरण लहामटे, आमदार आशुतोष काळे, आमदार रोहित पवार, आमदार अमोल खताळ, आमदार हेमंत ओगले, आमदार विठ्ठल लंघे, आमदार काशिनाथ दाते, आमदार विक्रम पाचपुते, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या डॉ. सुस्मिता विखे पाटील, प्र. ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, सहायक ग्रंथालय संचालक सचिन जोपुळे आदी उपस्थित राहणार आहेत.

या प्रसंगी ग्रंथपालन प्रमाणपत्र परीक्षेत प्रथम क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांचा तसेच साहित्यिकांचा आणि उत्कृष्ट ग्रंथ वाचकांचा गौरव करण्यात येणार आहे. तसेच, मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निबंध स्पर्धा पारितोषिक वितरण आणि RRRLF पोर्टलवर १०० टक्के ग्रंथालयांची ऑनलाईन नोंदणी करणाऱ्या तालुका ग्रंथालयांना प्रशस्तीपत्र वितरण होणार आहे.

या ग्रंथोत्सवानिमित्त २८ फेब्रुवारी रोजी सकाळी ८.३० वाजता ग्रंथदिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. या ग्रंथदिंडीचा शुभारंभ डॉ. सुजय विखे पाटील यांच्या हस्ते व लोणी बु. च्या सरपंच श्रीमती कल्पना मैड, पद्मश्री विखे पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, प्रवरानगरचे प्राचार्य प्रा. डॉ. प्रदीप दिघे, उपप्राचार्य सौ. छाया गलांडे, शब्दगंध साहित्यिक परिषदेचे सुनील गोसावी यांच्या प्रमुख उपस्थितीत पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील व लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील स्मारक, बस स्थानकाजवळ, लोणी बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर येथे होणार आहे. उद्घाटन कार्यक्रमानंतर तसेच १ मार्च रोजी परिसंवाद, व्याख्याने आणि निमंत्रित कवींचे कविसंमेलनही आयोजित करण्यात आले असल्याची माहिती देण्यात आली आहे.

# नगरमध्ये नियमभंग करणाऱ्या वाहन चालकांवर कारवाई; शहर वाहतूक शाखेची मोहीम, १२७ वाहनांना ८९ हजाराचा दंड

नगर – शहरातील प्रेमदान चौकात शहर वाहतूक शाखेतर्फे नियमभंग करणाऱ्या दुचाकी चालकांवर कारवाईची मोहीम राबविण्यात आली. यामध्ये १२७ वाहनांवर ई चलना कारवाई करण्यात आली. या कारवाईमध्ये २२ हजार ५०० रुपयांचा रोख दंड वसूल करण्यात आलेला आहे. या सर्व वाहनांवर एकूण ८९ हजाराचा दंड करम्यात आलेला आहे.

जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलूबमें यांच्या आदेशान्वये उपविभागीय पोलीस अधिकरी डॉ. दिलीप टिपरसे व शहर वाहतुक शाखेचे पोलिस निरीक्षक बाबासाहेब बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक मन्सूर सय्यद, उपनिरीक्षक असिफ शेख, पोलिस अंमलदार शिरसाट, संजय शेटे, मधुकर ससे, सतिश दळवी, प्रवीण खंडागळे, अजय जपकर, आबासाहेब चव्हाण, ज्ञानेश्वर खराडे, दिशान शेख, सूदर्शन कारखेले, अरविंद चोटीले, महेश घोरपडे यांनी ही कारवाई केली आहे.

या कारवाईमध्ये वाहतूक नियमभंग करणारे वाहनचालकांविरुध्द मोटार वाहन कायद्या प्रमाणे वाहनास काळी काच ९, लायसन्स सोबत न बाळगणे २५, लायसन्स नसणे १, ट्रिपल शिट वहन चालवणे ४, अल्पवयीन मुलांनी वाहन चालवणे एक, बुलेट फटाका सायलेन्सर एक, वाहनास नंबर प्लेट नसणे / फॅन्सी नंबर प्लेट बसवणे ७२ इतर २२ आशा एकूण १२७ ई चलान कारवाई करण्यात आलेल्या आहेत. २२ हजार ५०० रुपये रोख दंड वसुल करण्यात आलेला आहे. एकूण दंड ८९ हजाराचा करण्यात आलेला आहे.



नगरमध्ये नियमभंग करणाऱ्या वाहन चालकांवर कारवाई करताना शहर वाहतूक शाखेचे पथक.






अखिल भारतीय त्रैवार्षिक अधिवेशनात पारित ठरावांची तातडीने अंमलबजावणी करावी, या मागणीसाठी भारतीय मजदूर संघाचे धरणे आंदोलन करत निवेदन देण्यात आले.

# जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत भारतीय मजदूर संघाचे धरणे आंदोलन

## अधिवेशनात पारित ठरावांच्या अंमलबजावणीसाठी केंद्र सरकारला इशारा; कामगारांच्या हक्कांसाठी जोरदार घोषणा

नगर – भारतीय मजदूर संघाच्या वतीने आज जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार धरणे आंदोलन करत विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. भगवान जगन्नाथ यांच्या पवित्र नगरी पुरी (ओडिशा) येथे ६, ७ व ८ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या संघाच्या २१ व्या अखिल भारतीय त्रैवार्षिक अधिवेशनात पारित ठरावांची तातडीने अंमलबजावणी करावी, या मागणीसाठी हे आंदोलन करण्यात आले. जिल्हाधिकाऱ्यांमार्फत पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय श्रम व रोजगार मंत्री मनसुख मंडाविया यांना निवेदन पाठविण्यात आले.

अधिवेशनात देशभरातील प्रतिनिधींनी कामगारांच्या ज्वलंत प्रश्नांवर सखोल चर्चा करून सर्व प्रस्ताव सर्वानुमते मंजूर केले होते. अधिवेशनापूर्वी संघाच्या प्रतिनिधीमंडळाने केंद्रीय श्रम मंत्र्यांची भेट घेऊन विविध मागण्यांबाबत निवेदन दिले होते. त्या वेळी सकारात्मक कार्यवाहीचे आश्वासन देण्यात आले होते; मात्र अद्याप ठोस निर्णय न झाल्याने संघाने देशव्यापी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे.

निवेदनात सर्व क्षेत्रांतील कामगारांसाठी श्रमकायदे कोणतीही सूट न देता एकाचवेळी लागू करावेत, इंडस्ट्रियल रिलेशन कोड २०२० व ऑक्युपेशनल सेफ्टी, हेल्थ अॅण्ड वर्किंग कंडीशन कोड २०२० मधील कामगारविरोधी तरतुदींमध्ये दुरुस्ती करावी, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. तसेच त्रिपक्षीय यंत्रणेचे पुनरुज्जीवन करून इंडियन लेबर कॉन्फरन्स तात्काळ बोलवावी व विविध समित्यांचे पुनर्गठन करून त्या प्रभावीपणे कार्यरत कराव्यात, असेही निवेदनात नमूद आहे.

ईपीएस–९५ अंतर्गत किमान पेन्शन रुपये १००० वरून ७५०० रुपये प्रतिमाह महागाई भत्त्यासह वाढवावी, ईपीएफसाठी वेतन मर्यादा १५,००० वरून ३०,००० रुपये करावी, तसेच ईएसआयसी कव्हरेजची मर्यादा २१,००० वरून ४२,००० रुपये करावी, बोनस कायद्यातील पात्रता व गणना मर्यादेत वाढ करावी, अशा ठोस आर्थिक मागण्या संघाने केल्या आहेत.

संविधानातील कलम १४, १५, १६ व २१ च्या भावनेनुसार स्कीम वर्कर व कंत्राटी कामगारांना कायमस्वरूपी करावे, महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था व शासकीय लिपिक संवर्गीय कर्मचाऱ्यांच्या वेतनातील चौथ्या वेतन आयोगातील त्रुटी दूर कराव्यात, तसेच सर्वसाधारण भरतीवरील निर्बंध तात्काळ उठवून हमीदार रोजगार द्यावा, अशीही जोरदार मागणी करण्यात आली.

या धरणे आंदोलनावेळी पुणे विभाग प्रमुख व अहिल्यानगर प्रभारी श्री अर्जुनजी चव्हाण, बँक ऑफ महाराष्ट्र कर्मचारी संघाचे अध्यक्ष नहार साहेब, भारतीय मजदूर संघाचे जिल्हाध्यक्ष सुजितजी उदरभरे, जिल्हा सचिव कृष्णा साठे, प्रसिद्धीप्रमुख अविनाश सिरसुल, अनिल नजन, गणेश कुंभारे, संतोष जेजुरकर, आकाश कदम, ओमप्रकाश सिंग, समीर वाघमारे, राम शर्मा, जगदीश क्षीरसागर आदींसह विविध संलग्न संघटनांचे पदाधिकारी व महिला कार्यकर्त्या मोठ्या संख्येने सहभागी झाल्या. जोरदार घोषणाबाजी करत कामगारांच्या हक्कांसाठी लढा तीव्र करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.


**ग्रामपंचायत मंजूर, ता.कोपरगांव, जि.अहिल्यानगर**

**बी–१ निविदा**

ग्रामपंचायत मंजूर ता.कोपरगाव जि. अहिल्यानगर येथील खालील कामांचे नोंदणीकृत ठेकेदार/पुरवठादार यांचेकडून सीलबंद बी–१ निविदा दरपत्रके मागविण्यात येत आहे.

| कामाचे नाव | योजनेचे नाव | ठेकेदाराचा वर्ग | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|
| मौजे मंजूर येथील गावठाण अंगणवाडी दुरुस्ती करणे | १५ वा वित्त आयोग सन २०२४–२५ | सु.बे. | ३ लक्ष |
| मौजे मंजूर येथे हंडेवाडी विहिरीस संरक्षण जाळी बसवणे | १५ वा वित्त आयोग सन २०२५–२६ | सु.बे. | २,३०,०००/- |
| मौजे मंजूर येथील जगताप वस्ती येथे पिण्याच्या पाण्याच्या टाकीचे चैन लिंक कंपाउंड करणे | १५ वा वित्त आयोग सन २०२५–२६ | खुला | १,७०,०००/- |

**काम पूर्ण करण्याचा कालावधी : ६ महिने**

अटी व शर्ती १) निविदा व माहितीपत्रक ग्रामपंचायत कार्यालयात दि.२६/०२/२०२६ ते दि.०४/०३/२०२६ या कालावधीत कार्यालयीन वेळेत मिळतील. २) निविदा दि.०५/०३/२०२६ रोजी १०.०० वा. ग्रामपंचायत कार्यालयात उघडण्यात येतील.३) निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.

ग्रामसेवक/सरपंच

ग्रामपंचायत मंजूर, ता. कोपरगाव,जि.अहिल्यानगर


# गांजा तस्करी करणारा सर्पमित्र आकाश जाधवला अटक

## न्यायालयाने सुनावली पाच दिवस पोलीस कोठडी, कोतवाली पोलिसांची कारवाई

नगर – सर्पमित्र आणि रिलस्टार म्हणून अहिल्यानगर जिल्ह्यात प्रसिद्ध असलेला आकाश मनोहर जाधव (रा. नागरदेवळे, ता. नगर) हा अखेर गांजा तस्करी प्रकरणी पोलिसांच्या जाळ्यात अडकला असून छत्तीसगड पोलिसांच्या ताब्यातून त्याला २४ फेब्रुवारीला रात्री अहिल्यानगरमध्ये आणण्यात आले. २५ फेब्रुवारीला त्याला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला सहा दिवसांची (२ मार्चपर्यंत) पोलीस कोठडी सुनावली आहे. कोतवाली पोलीस ठाण्यात त्याच्याविरोधात गांजा तस्करीचा गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, आकाश जाधव ओडिशा राज्यातून मोठ्या प्रमाणात गांजा खरेदी करून मध्य प्रदेश व नागपूरमार्गे मालवाहतूक ट्रक आणि रुग्णवाहिकांमधून अहिल्यानगरमध्ये आणत होता. २० जून २०२५ रोजी केडगाव बायपासवर पोलिसांनी छापा टाकत त्याच्या १२ साथीदारांना रंगेहात पकडले होते. मात्र, त्यानंतर जाधव फरार झाला होता. अखेर छत्तीसगडमध्ये तो पोलिसांच्या हाती लागला.

कोतवाली पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्याच्या अनुषंगाने आकाश जाधवला छत्तीसगड पोलिसांकडून ताब्यात घेण्यात आले होते. त्यानंतर काल न्यायालयात हजर करताच त्याची पोलीस कोठडी दोन मार्चपर्यंत मंजूर करण्यात आली. या प्रकरणामुळे शहरात मोठी खळबळ उडाली असून सर्पमित्र या नावाखाली चालणाऱ्या त्याच्या हालचालींवर पोलिसांनी बारकाईने लक्ष ठेवले होते. आता या रॅकेटमधील इतर आरोपी, आर्थिक व्यवहार आणि आंतरराज्यीय कनेक्शन उघड करण्यासाठी पोलिसांनी चौकशीचा वेग वाढवला आहे. दरम्यान, या प्रकरणातून आणखी मोठे धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### सर्पमित्र ते गांजा तस्कर


मुळा नागरदेवळे येथील आकाश जाधव सुरुवातीला विषारी साप पकडणारा सर्पमित्र म्हणून ओळखला जात होता. समाजसेवेच्या नावाखाली प्रसिद्धी मिळविल्यानंतर त्याने झटपट पैसा कमावण्यासाठी गांजाच्या काळ्या धंद्यात उडी घेतली. ओडिशामधील उत्पादन केंद्रांमधून तो मोठ्या प्रमाणात माल आणत असल्याचे समोर आले आहे.

### रुग्णवाहिकेचा वापर करून तस्करी

तपासात आणखी एक धक्कादायक बाब उघड झाली असून जाधव छत्तीसगडहून गांजा खरेदी करून रुग्णवाहिकेतून तो मध्यप्रदेश व नागपूरमार्गे नगरमध्ये पोहोचवत होता. येथे माल उतरवून जिल्ह्यातील विविध भागात त्याची विक्री केली जात होती. ऑनलाइन पैशांची मोठी देवाणघेवाण झाली आहे. गांजाच्या बदल्यात मोठ्या प्रमाणात ऑनलाइन व्यवहार होत होते. या आर्थिक साखळीतील आरोपींनाही पोलिसांनी अटक केली असून जाधवचे संपूर्ण नेटवर्क उद्ध्वस्त करण्यात आले आहे. पुणे शहरातही त्याच्याविरोधात गांजा तस्करीचे गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या प्रकरणाचा अधिक तपास कोतोली पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक कुणाल सपकाळ करत असून आणखी धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# अरहान खान याचा रमजानचा पहिला रोजा

नगर – मुकुंदनगर येथील अरहान अजीम खान याने रमजानचा पहिला रोजा (उपवास) केला. वयाच्या सहाव्या वर्षी त्याने रमजानच्या पवित्र महिन्यात अन्न, पाणी विना उपास केला आहे.



पहाटे त्याने सहेरी करून भक्तीभावाने नमाज अदा केली व संध्याकाळी रोजा इफ्तारीने सोडला तब्बल तेरा तासाहून अधिक काळ त्याने निर्जली रोजा ठेवला होता. तो अल नूर इंग्लिश स्कूल मध्ये शिक्षण घेत आहे. त्याने केलेल्या रोजाबद्दल नातेवाईक व परिसरातील नागरिकांनी त्याचे कौतुक करून अभिनंदन केले.

